
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २११
www.ramprahar.com

◆ मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### आजपासून मुंबईत क्लायमेट वीक; मान्यवर साधणार संवाद



**मुंबई** : भारताच्या पहिल्या मुंबई क्लायमेट वीकमध्ये हवामान कृतीच्या लढ्यात देशाचे दोन अवकाशवीर राकेश शर्मा आणि शुभांशू शुक्ला प्रथमच एकाच मंचावर एकत्र येणार आहेत. या ऐतिहासिक क्षणी क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव होणार आहे. १७ ते १९ फेब्रुवारीदरम्यान जिओ वर्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणाऱ्या मुंबई क्लायमेट वीकचा हा महत्त्वपूर्ण भाग आहे. हवामान विषयावरील जागतिक संवादासाठी हा मंच उभारण्यात आला असून प्रोजेक्ट मुंबई ही संस्था या कार्यक्रमाचे आयोजक आहे, तर महाराष्ट्र शासन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महापालिका यांचे या कार्यक्रमास सहकार्य लाभले आहे. क्लायमेट वीकच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी विशेष सत्रात दोन्ही अवकाशवीर विद्यार्थ्यांशी व उपस्थितांशी संवाद साधतील.

**अंतरंग**

पोलादपूरमध्ये भाजपकडून काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा निषेध/२

मुरूडला जोडणाऱ्या एकदरा पुलाच्या कामाला सुरुवात/५

यूएसडब्ल्यूपीएलमध्ये उलवे ग्लॅडिएटर्स संघ विजेता/८

### शाळांना अल्पसंख्याक दर्जा प्रकरण

# मुख्यमंत्र्यांकडून निर्णयाला स्थगिती, चौकशीचेही आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर काही तासांमध्ये जवळपास २० संस्थांच्या ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी हा कारनामा केला आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित निर्णयाला स्थगिती दिली आहे तसेच या प्रकरणाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा, असे आदेशही दिले आहेत.



कर्तबगार नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्रावर शोककळा पसरली होती. बारामती येथील विमान दुर्घटनेत अजितदादांसह पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातानंतर महाराष्ट्रासह देशातील वरिष्ठ नेत्यांपासून ते सर्वसामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांनी शोक व्यक्त केला, मात्र याच दिवशी मंत्रालयात अधिकारीवर्गाकडून अत्यंत लाजीरवाणी घटना घडल्याचे समोर आले आहे.

राज्यात शासकीय दुखवटा असताना शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जा दिला जात होता. ज्या ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा दिला, त्यात २५ पोदार इंटरनॅशनलच्या शाळांचा समावेश आहे. एखाद्या शाळेला अल्पसंख्याक दर्जा मिळाल्यानंतर त्यांना शिक्षक भरतीत टीईटी लागू होत नाही. या शाळांवर आरटीई कायदाही लागू होत नाही. माणिकराव कोकाटे यांनी १२ ऑक्टोबरला या प्रमाणपत्रांना स्थगिती दिली होती. कोकाटेंना मंत्रिपद सोडावे लागल्यानंतर हा विभाग उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे होता, मात्र असंवेदनशील अधिकाऱ्यांनी अजितदादांच्या निधनानंतर लगेचच ही प्रमाणपत्रे देण्याचा निर्णय घेतला.

संपूर्ण प्रकार समोर येताच ७५ शाळांना दिलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या निर्णयाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आणि ज्या अधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला त्यांच्यावर कारवाईचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

दरम्यान, घाईघाईने शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याची ही घटना चुकीची आहे. त्यामुळे मंत्रालयातील या प्रकाराचा तपास करून जो कुणी यात दोषी आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी दिला आहे.



## पंतप्रधान मोदी आज मुंबईत

**मुंबई : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी (दि. १७) एक दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. पंतप्रधान मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्यात दुपारी २.३० वाजता लोकभवन (यापूर्वीचे राजभवन) येथे द्विपक्षीय बैठक पार पडणार आहे.

यानंतर सायंकाळी ५ वाजता पीएम मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रोन यांची हॉटेल ताज येथे विविध कंपन्यांच्या सीईओंसोबत राऊंडटेबल चर्चा होणार आहे. मग दोन्ही नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ६.३० वाजता मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया परिसरात इंडो-फ्रान्स इयर ऑफ इनोव्हेशन कार्यक्रम होणार आहे. फ्रान्सच्या वाणिज्य दूतवासाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून याचा मुख्य कार्यक्रम मंगळवारी होईल.

# उलवेतील रामशेठ ठाकूर मैदानावर रंगणार कबड्डीचा थरार!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्ताने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गटाची जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा २० ते २२ फेब्रुवारी या कालावधीत उलवे नोड सेक्टर १२मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलजवळील रामशेठ ठाकूर मैदानात होणार आहे. या स्पर्धेला छत्रपती पुरस्कार विजेते, अर्जुनवीर, राज्य संघटनेचे पदाधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

खेळ आणि खेळाडूंच्या विकासासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने नेहमीच ताकद दिली आहे. रायगड जिल्ह्यातील प्रौढ महिला व पुरुष कबड्डी खेळाडूंकरिता ही स्पर्धा जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्वरूपात घेतली जाणार असून

### रायगडचा सक्षम संघ घडवण्यासाठी निवड चाचणी स्पर्धा



आगामी राज्यस्तरीय स्पर्धेच्या धर्तीवर जिल्ह्याचा संघ निवडण्याच्या दृष्टीने या स्पर्धेचे महत्त्व विशेष आहे. स्पर्धेकरिता जिल्ह्यातील १९८ पुरुष संघ आणि ३२ महिला संघांची नोंदणी झाली आहे. त्या अनुषंगाने २७७२ पुरुष आणि ४४८ महिला असे एकूण ३२२० खेळाडू सहभागी होणार आहेत. १९८ पुरुष आणि ३२ महिला संघांमधून प्रत्येकी संभाव्य २० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. त्यातून निवडलेला १४ पुरुष व १४ महिला खेळाडू संघ महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या राज्यस्तरीय स्पर्धेत रायगडचे प्रतिनिधित्व करेल.

या दोन्ही संघांचे मार्गदर्शन सराव शिबिरसुद्धा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे याच मैदानावर घेण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने नुकतेच रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या १०० पंचांचे एकदिवसीय मार्गदर्शन शिबिर पार पडले.

जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या माध्यमातून उत्कृष्ट आणि चुरशीच्या सामन्यांची क्रीडारसिकांना पर्वणी असणार आहे. त्याचबरोबर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा महिला व पुरुष सक्षम संघ मिळणार आहे. त्यामुळे ही निवड चाचणी स्पर्धा अत्यंत महत्वाची ठरणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी जनरल सेक्रेटरी अ‍ॅड. आस्वाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेची जय्यत तयारी सुरू असून खेळाडू व प्रेक्षकांना या स्पर्धेचा लाभ व्हावा यासाठी नियोजनाचा संपूर्ण आढावा खुद्द लोकनेते रामशेठ ठाकूर घेत आहेत.

## निवडक


### राजस्थानमध्ये भीषण आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू

**जयपूर :** राजस्थानच्या अलवार जिल्ह्यातील भिवाडी औद्योगिक क्षेत्रात सोमवारी (दि. १६) बेकायदेशीर फटाका कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत किमान आठ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला आहे. कारखान्यात मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेल्या दारूगोळा आणि कार्डबोर्डमुळे भीषण स्फोटानंतर आग झपाट्याने पसरली. अग्निशमन दलाने ही आग विझविली.

### कुख्यात डॉन अबू सालेमची सुटका याचिका फेटाळली

**नवी दिल्ली** : १९९३च्या मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटातील कुख्यात डॉन अबू सालेमची सुटका याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. सालेमने तुरुंगात २५ वर्षे पूर्ण केली असल्याने आता त्याची सुटका करण्यात यावी, असा युक्तिवाद त्याच्या वकिलाने केला होता. यावर न्यायालयाने प्रत्यार्पण करारातील अटींनुसार सालेमला ज्या सवलती मिळाल्या त्याचा आणि मूळ शिक्षेचा ताळमेळ बसत नाही, असे सांगत सुटका याचिका फेटाळली.

# खोपोलीत मंगळसूत्र चोराला पकडून नागरिकांनी दिला चोप



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील काटरंग चौकात शतपावली करणाऱ्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पळणाऱ्या दुचाकीस्वार भामट्यास नागरिकांनी पाठलाग करून पकडले. यानंतर संतप्त नागरिकांनी भामट्यास बेदम चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केले.

मिळालेल्या माहितीनुसार एका किराणा दुकानासमोर वृद्ध महिला रविवारी (दि. १५) रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास शतपावली करीत असताना समोरून भरधाव मोटरसायकल (एमएच ४७ बीक्यू २६१७)वरून दोन जण आले. यावेळी मागे बसलेल्या मुस्सा अण्णू सय्यद इराणी उर्फ इराणी (रा.आंबिवली, ठाणे) याने वृद्धेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून दोघेही मोगवाडीच्या दिशेला पळाले. या झटापटीत महिलेच्या गळ्याला दुखापत झाली. या दरम्यान महिलेच्या मुलाने सतर्कता बाळगत मित्राच्या मोबाईलवरून माहिती देताच चोरट्याचा पाठलाग करून मुस्सा अण्णू सय्यद इराणी उर्फ इराणी याला पकडण्यात आले. उपस्थित नागरिकांनी चोप देत त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले.

आरोपीचा साथीदार मोटरसायकलचालक सलमान शाजी (रा. इराणी वस्ती, आंबिवली, ठाणे) पसार झाला. दोन्हीही चोरट्यांविरोधात खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.





# केबीपी कॉलेजमध्ये मॉडेलर क्लासरूमचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये प्रिफेब्रिकेटर मॉडेलर क्लासरूमचा भूमिपूजन सोहळा सोमवारी (दि. १६) संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव विकास देशमुख, नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य अ‍ॅड. पी.सी. पाटील, संगीता पाटील, मनोज जालनावाला उपस्थित होते.

संस्थेचे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे यांनी वाशी कॉलेजकडून होत असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले तसेच या क्लासरूमच्या निर्मितीसाठी संस्थेच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची जी प्रगती होत आहे याचे कौतुकही त्यांनी केले.

भूमिपूजन सोहळ्याला शिक्षक व शिक्षकेतर सेवकवृंद उपस्थित होता. सोहळ्याचे नियोजन प्राचार्य डॉ. नायक यांनी केले होते, तर कॉन्ट्रॅक्टर माजिद शेख यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे शाल व बुके देऊन स्वागत केले.

# रायगडात आदिवासी महिलांची पहिली मच्छीमार संस्था स्थापन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याच्या साळोख धरण परिसरातील आदिवासी महिलांनी ऐतिहासिक पाऊल उचलत रायगड जिल्ह्यातील पहिली आदिवासी महिलांची मच्छीमार सहकारी संस्था स्थापन केली आहे. जिजाऊ मच्छीमार सहकारी संस्था नावाने नोंदणीकृत झालेल्या या संस्थेत सर्व सदस्य आदिवासी महिला असून संस्थेचे नेतृत्वदेखील महिलांकडेच आहे.

सन १९८४मध्ये बांधलेल्या साळोख धरणातील मासेमारीचे टेंडर वर्षानुवर्षे बाहेरील कंत्राटदारांना दिले जात होते. स्थानिक आदिवासींना प्राधान्य न मिळाल्याने महिलांना हक्काच्या जलस्रोतामध्येही लपूनछपून मासेमारी करावी लागत होती. पकडले जाणे, अपमानास्पद वागणूक आणि कंत्राटदारांकडून होणारा त्रास हा त्यांच्या रोजच्या जीवनाचा भाग बनला होता. या अन्यायाविरुद्ध स्थानिक नेत्या सुनीता कांबडी यांच्यासह निसर्ग सामाजिक संस्था आणि कोरो इंडिया यांनी एकत्रित प्रयत्न सुरू केले. (पान २ वर..)

> “ आम्हाला कायदेशीररित्या हक्क मिळाला हा आमच्यासाठी स्वाभिमानाचा क्षण आहे. महिलांच्या नेतृत्वात चालणारी ही संस्था केवळ रोजगार देणार नाही, तर आमच्या पुढच्या पिढीसाठी सुरक्षित आणि सन्मानजनक भविष्य तयार करेल. निसर्ग सामाजिक संस्था आणि कोरो इंडिया यांनी दिलेल्या साथीसाठी आम्ही आभारी आहोत.
>
> –सुनिता कांबडी, अध्यक्ष, जिजाऊ मच्छीमार सहकारी संस्था



# पोलादपूरमध्ये भाजपकडून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा निषेध

**पोलादपूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टीपू सुलतान यांच्यासोबत केल्याप्रकरणी राज्यात सर्वत्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा निषेध केला जात असताना पोलादपूर भाजपाचे तालुकाध्यक्ष वैभव चांदे यांच्या नेतृत्वाखाली सपकाळ यांची चित्रं जाळून छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयासमोरे निषेध करण्यात आला. याप्रसंगी भाजपा महिला आघाडी जिल्हाउपाध्यक्ष तनुजा भागवत यादेखील निषेधकर्त्यांत सामील होत्या.



दोन दिवसांपूर्वी टीपू सुलतान याला शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघितले पाहिजे, अशी भूमिका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले होते. टीपू सुलतान यांनी छत्रपतींचा आदर्श ठेवून इंग्रजांविरूध्द लढण्याची भूमिका घेतल्याचे यावेळी सपकाळ यांनी सांगितले होते. यावर राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आक्षेप घेऊन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा निषेध केला.

यानंतर राज्यात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात निषेधाची तीव्रता वाढविणाऱ्या आंदोलनांची मालिका सुरू झाली. याचअनुषंगाने, पोलादपूर तालुका भाजपतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयासमोर तालुकाअध्यक्ष वैभव चांदे, राजेश सकपाळ, महेश निकम, प्रमोद चव्हाण, आशुतोष दरेकर, सपना बुटाला, गणेश शेठ, मनोज पवार आणि संचिता चांदे यांनी भाजपा महिला आघाडी जिल्हाउपाध्यक्ष तनुजा भागवत यांच्या उपस्थितीत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात निषेधाच्या घोषणा देऊन त्यांची छायाचित्रे जाळली.

# मुरुड-साळाव रस्त्यासाठी ३२ मोऱ्या; वाहतुकीस होतोय अडथळा

**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत मुरुड ते साळाव हा ३२ किलोमीटर रस्ता असून सध्या या रस्त्याचे काँक्रीटीकरण होत असून रस्ता जलद गतीने करण्याचा प्रयत्न सुरू आहे. उत्कृष्ट बनवण्यात आलेला डांबरी रस्ता फक्त दीड वर्षातच उखडून काढला गेला व तातडीने काँक्रिट रस्ता बनवण्याचा घाट रचला गेला. यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी सुद्धा मंजूर करण्यात आला.



मुरुड ते साळाव रस्त्यासाठी ३२ मोऱ्या बनवण्यात आलेल्या आहेत. पावसाच्या पाण्याचा सहज निचरा व्हावा व पाणी कोठेही तुंबून राहू नये यासाठी मोऱ्या खूप आवश्यक होत्या. परंतु विकासकाने गेल्या अनेक दिवसापासून मोऱ्या खणून ठेवून काही ठिकाणी पर्यायी मार्ग सुद्धा काढला. काही मोऱ्या नुसत्या खणून ठेवल्यामुळे मूळ रस्ता आखूड होऊन दोन्ही बाजूची ट्रॅफिक जाम होत आहे. गेल्या अनेक दिवसापासून या मोऱ्या आहेत त्याच अवस्थेत असून मोऱ्याची कामे पूर्ण करण्यात आलेली नाहीत.

मुरुड- मुबई हा महत्वाचा मार्ग असून येथे दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. तसेच मुरुड , काशीद, व जंजिरा किल्ला पहाण्यासाठी विशेष करून शनिवार रविवारी हजारोच्या संख्येने पर्यटक येत असतात. अश्यावेळी मोऱ्याची कामे रेंगाळली असल्याने वाहनांच्या मोठ्या रांगा पहावयास मिळत आहेत. रस्ता खणलेला व दुसऱ्या बाजूस मोऱ्यांच्या कामे अर्धवट त्यामुळे पर्यटक सुधा त्रस्त झाले असून त्यांची संख्या कमी झाल्याचे दिसून येत आहे.

स्थानिक ग्रामस्थ व पर्यटक यांनी मागणी केली आहे की, सर्वप्रथम मोऱ्यांच्या कामे झटपट पूर्ण करण्यात यावी तसेच काँक्रिट रस्त्याचा दर्जा उत्तम असावा जेणेकरून रस्ता हा अनेक वर्ष टिकेल. अर्धवट मोऱ्यांच्या कामे ठेवल्याने मोठी अवजड वाहने रस्ता क्रॉस करण्यात विलंब होत आहे. काशीद संपताच बार्शिव येथील घाट रस्ता सुरू होतो. अगदी सुरुवातीलाच संरक्षक भिंत बांधण्यात येत आहे. काही अंशी हे बांधकाम पूर्ण झाले तद्नंतर खूप दिवस हे काम अर्धवट सोडण्यात आले आहे. अनेक दिवस काम बंद आहे. तरी ही सुधा संरक्षक भिंत बांधण्याचे काम तात्पुरते पूर्ण करून रस्ता मोकळा करावा अशी मागणी होत आहे. मुरुड ते साळाव रस्त्याचे काम जलद गतीने पूर्ण होण्यासाठी कामगारांची संख्या वाढवण्यात यावी जेणेकरून मे अखेर हे काम पूर्ण होईल

# मध्य रेल्वेने आर्थिक वर्षात भंगार विक्रीतून मिळवला ४०४.७२ कोटी रुपयांचा महसूल

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने भंगार विक्रीतून महसूल निर्माण करणाऱ्या मालमत्तेत रूपांतर करणे आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे या प्रमुख मोहिमेचे उद्दिष्ट असलेल्या शून्य भंगार स्थिती साध्य करण्यासाठी आपली दृढ वचनबद्धता पुन्हा दर्शविली आहे. दि. ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत, मध्य रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भंगार विक्रीतून ४०४.७२ कोटी रुपये मिळवले आहेत, जे मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये फेब्रुवारी २०२५ पर्यंतच्या याच कालावधीत झालेल्या ३९३.६५ कोटी रुपयांच्या भंगार विक्रीच्या तुलनेत अंदाजे २.८१% वाढ नोंदवली आहे.



विविध श्रेणीतील भंगार आणि वापरात नसलेल्या साहित्याची पद्धतशीर विल्हेवाट लावून ही महत्त्वपूर्ण कामगिरी साध्य करण्यात आली आहे, ज्यात रेल्वे रूळांचे भंगार: ४०,१७७ एमटी, स्लीपर्स: २,५५,३१८ नग, फेरस भंगार: २५,७९० एमटी, नॉन-फेरस भंगार: ३,३२५ एमटी, रोलिंग स्टॉक: ४७ लोकोमोटिव्ह, ७० कोच आणि ११० वॅगन यांचा समावेश आहे.

मध्य रेल्वे स्टोअर्स विभागाने कुर्ला कटिंग यार्ड, ट्रॅक्शन मशीन वर्कशॉप (नाशिक), परळ वर्कशॉप, मनमाड वर्कशॉप, तसेच मध्य रेल्वेच्या पाचही विभागांमध्ये दुर्गम आणि विखुरलेल्या ठिकाणी पडलेल्या भंगार साहित्याची शोधून काढून त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी सघन आणि सुसंघटित मोहिमा हाती घेतल्या आहेत.

विभागांमध्ये भुसावळ विभाग आघाडीवर आहे, तिथे ९७.७२ कोटी रुपयांची सर्वाधिक भंगार विक्री नोंदवली आहे. हे यश मध्य रेल्वेच्या शून्य स्क्रॅप मिशन पूर्ण करण्यासाठी आणि आर्थिक विवेक, कार्यक्षमता आणि पर्यावरणीय शाश्वतता वाढवण्यासाठीच्या सातत्यपूर्ण आणि संकल्पाचे प्रतिबिंब आहे.

# आज वर्षातील पहिले सूर्यग्रहण

**मुंबई : प्रतिनिधी**

खगोलशास्त्र आणि धार्मिक परंपरांमध्ये रस असणाऱ्यांसाठी २०२६ हे वर्ष विशेष महत्त्वाचं ठरणार आहे. या वर्षातील पहिलं सूर्यग्रहण मंगळवार, १७ फेब्रुवारी रोजी होणार असून, ते माघ अमावस्येच्या दिवशीच पार पडणार आहे. विशेष म्हणजे हे कंकणाकृती सूर्यग्रहण असणार आहे, ज्यामुळे खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातूनही या घटनेला मोठं महत्त्व आहे.

पंचांगानुसार, सूर्यग्रहणाची सुरुवात दुपारी ३ वाजून २६ मिनिटांनी होईल, तर सायंकाळी ७ वाजून ५७ मिनिटांपर्यंत हे ग्रहण चालू राहील. खगोलतज्ज्ञांच्या माहितीनुसार, हे ग्रहण अंटार्क्टिका, आफ्रिकेतील काही भाग आणि दक्षिण अटलांटिक महासागराच्या परिसरात स्पष्टपणे दिसणार आहे. परंतु भारतात हे सूर्यग्रहण दिसणार नसल्याने देशात सुतक काळ लागू होणार नाही.

आरोग्य आणि आर्थिक बाबींमध्ये सावधगिरी ज्योतिषीय मान्यतेनुसार, ग्रहण काळात आरोग्य व आर्थिक विषयांमध्ये विशेष काळजी घेणं आवश्यक मानलं जातं.

# जि.प.कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

**अलिबाग :प्रतिनिधी**

आपल्या विविध मागण्यांसाठी राज्यातील जिल्हा परिषद कर्मचार्यांनी सोमवारापासून (दि. १६) काम बंद आंदोलन सुरू केले आहे. रायगड जिल्हा परिषदेतील कमर्चचारी देखील या आंदोलनात सहभागी झाले आहेत. शासनाने जर मागण्यांकडे दर्लक्ष केले तर बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल,असा इशार देण्यात आला आहे.

जय महाराष्ट्र शसकीय निमशासकीय आधिकारी व कर्मचारी संघटनेने संपूर्ण राज्यात सोमवारपासून काळ्याफिती लावून कामबंद आंदोन पूकारले आहे. या संघटनेच्या रायगड जिल्हा शाखेचे कर्मचारी या आंदोलनामध्ये सहभागी झाले आहेत. सोमवारी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात कर्मचार्यांनी काळ्याफिती लावून निदर्शने केली.

जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना रायगड शाखेचे जिल्हा पालक अध्यक्ष सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. जिल्हा अध्यक्ष मंगेश ठाकूर, कार्याध्यक्ष प्रमोद पाटील, खजिनदार अमोल म्हात्रे, सचिव प्रशांत जुईकर, जिल्हा उपाध्यक्ष सौ. संजिवनी घरत आदी यावेळी उपस्थित होते.

लिपीक संवर्गाच्या चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारीत वेतन श्रेणी लागू करा. पदनामात बदल करा. पदोन्नतीची साखळी कमी करा. जशाच तशी जुनी पेन्शन लागू करा. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षासुचीवर असलेल्या सर्वांना जूनी पेन्शन लागू करा. गोदावरी महामंडळास स्वायत्त करत असताना वर्ग ३ व ४ कर्मचार्यांचे वेतन पुर्वीप्रमाणे कोषागार कार्यालयामार्फत करा. जिल्हा परिषदेमधील अधिकारी व कर्मचार्यांचे समावेशन मृद व जलसंधारण विभागात करू नये आदी मागण्यासांठी हे आंदोन सुरू करण्यात आले आहे.

# बुरुड समाज संघटनेकडून माऊली वृद्धाश्रमात खाऊवाटप

**माणगाव : बातमीदार**

'सेवा परमो धर्म, चा अर्थ निस्वार्थ सेवा हाच सर्वोच धर्म '...या उक्तीप्रमाणे माणगाव तालुका व माणगाव शहर बुरुड समाज संघटना या नेहमीच काही ना काही समाजासाठी सामाजिक कार्य करीत असतात. मग २००५ सालीचा दासगाव येथील दरडग्रस्त बुरुड समाज बांधवांचे स्वखर्चाने सामूहिक पिंडदान ,उत्तर कार्य करणे असेल किंवा कोरोना काळात समाजातील बांधवांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप असेल ,ज्येष्ठ नागरिक सत्कार, विद्यार्थी गुणगौरव यांसारखे कार्यक्रम करण्यासाठी ही संघटना समाजसेवे साठी नेहमीच अग्रेसर राहत आली आहे .हीच परंपरा कायम राखत



अखिल माणगाव तालुका बुरुड समाज संघटना व माणगाव शहर बुरुड समाज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून माणगाव बोरवाडी येथील माऊली वृद्धाश्रम येथे वृद्धांना फळे चिवडा व बिस्किट वाटप करण्याच्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

माणगाव शहर बुरुड समाज संघटना अध्यक्ष रवींद्र मोरे व सचिव संदेश सोंडकर, कार्याध्यक्ष हरेश नागे, उपाध्यक्ष जयेश मोरे, तरुण उद्योजक चेतन गायकवाड, शहर संघटना सचिव राजेंद्र खैरे, ज्येष्ट सल्लागार संतोष नागे गुरुजी, ज्येष्ट सल्लागार प्रभाकर नागे, प्रविण साळुंखे व राजेंद्र नागेश व इतर सर्व पदाधिकारी यांच्या सहमताने व एकत्रित सहकार्याने रविवार दि. १५ रोजी महाशिवरात्रीनिमित्त माऊली वृद्धाश्रम बोरवाडी ता. माणगाव जि. रायगड येथील वृद्धाधमातील वयस्कर मंडळीना सफरचंद, संत्री, केळी, बिस्किट पुडे, चिवडा असे एकत्र ५० पॅकेट वाटप करण्यात.

सदर प्रसंगी माऊली वृधाश्रम संचालक मंडळ अध्यक्ष भावे व इतर संचालक आदी उपस्थित होते.

# 'शर्विल'च्या विद्यार्थ्यांनी सैन्यामध्ये सहभागी व्हावे -कुमार जाधव

**कर्जत : प्रतिनिधी**

देशाच्या सेवेत असलेल्या कोणत्याही क्षेत्रात विद्यार्थ्यांनी आपले करिअर शोधावे. त्यात सहभागी होण्यासाठी प्राथमिक स्वरूपात महत्वाची असलेली ट्रेनिंग शर्विल स्कूमध्ये मिळत आहे. सर्वांच्या मनात देशाच्या सेवेबद्दल आदरभाव निर्माण व्हावा. विद्यार्थ्यांनी सैन्यामध्ये सहभागी होण्यासाठी आपले उद्दिष्ट निश्चित करावे. असे आवाहन निवृत्त जवान कुमार जाधव यांनी केले.



नेरळ येथील शार्विल स्कूल ऑफ एक्सलन्स या संस्थेच्या सिबिएससी स्कूल मधील विद्यार्थी यांना कमांडो ट्रेनिंग दिले जाते. नेरळ कर्जत रस्त्यावरील खोत सेलिब्रेशन मैदान येथे कमांडो प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. निवृत जवान कुमार जाधव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे संतोष पेरणे, अमोल जाधव तसेच शर्विल स्कूल ऑफ एक्सलन्स या संस्थेचे अध्यक्ष मुजाहिद खोत, विश्वस्त अब्दुल रौफ खोत, आत्माराम खंडागळे, उज्वला पाटील, अकॅडमीक प्रमुख सुशीला अनंथरमन, सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका मीना कुमार आणि मोईज खोत आदी प्रमुख उपस्थित होते.

शार्विल स्कूल मध्ये गेली दोन वर्षे कमांडो ट्रेनिंग अकॅडमी चालविली जात आहे.

पान १ वरुन

## रायगडात आदिवासी महिलांची पहिली मच्छीमार संस्था स्थापन

अकरा महिन्यांमध्ये सततच्या बैठका, लोकजागृती, लोकवाटा जमा करणे आणि प्रशासकीय अडचणींवर मात केल्यानंतर अखेर संस्थेची अधिकृत नोंदणी पूर्ण झाली. धरणात मासे सोडून मत्स्य पुनर्भरणाचा कार्यक्रम पार पडला. याच दिवशी जिजाऊ मच्छीमार सहकारी संस्थेला तलाव ठेका मिळाल्याची अधिकृत नोटीस फलक धरण परिसरात लावण्यात आला. कातकरी आणि ठाकर समुदायांची सामूहिक संसाधन व्यवस्थापनाची परंपरा पुन्हा दृढ करण्याचा संस्थेचा हेतू आहे. त्याचप्रमाणे जमीन-जंगल-जल या तिन्ही घटकांच्या एकत्रित उपजीविका मॉडेलचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संस्था कार्यरत राहणार आहे.

# महाशिवरात्रीनिमित्त उपेंद्र महाराज यांच्या नेतृत्वाखाली विशेष साधना

**नवी मुंबई बातमीदार**

महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त अंतर योग फाउंडेशनतर्फे ठाण्यात *प्रथमच आयोजित करण्यात आलेली सर्वांसाठी खुली आणि मोफत जीवन-परिवर्तनकारी विशेष साधना मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात संपन्न झाली. फाउंडेशनचे संस्थापक ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या भव्य आध्यात्मिक सोहळ्यास ठाणे, नवी मुंबई व मुंबई परिसरातील शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सकाळी ७ वाजता प्रारंभ झालेल्या या साधना शिबिरात आरोग्य, समृद्धी, सुदृढ नातेसंबंध, शैक्षणिक प्रगती आणि आध्यात्मिक उन्नती यांसाठी विविध प्रभावी उपक्रम आयोजित करण्यात आले. सहभागी साधकांनी ध्यान, जप, प्रार्थना आणि उर्जाधारित साधना यांचा अनुभव घेत आत्मिक समाधान लाभल्याचे सांगितले. कार्यक्रमादरम्यान महामृत्युंजय यज्ञ आणि शिवलिंगावर अभिषेक यांसारखे पारंपरिक व प्रभावी विधी संपन्न झाले. इच्छापूर्तीसाठी तपस्वी ब्राह्मणांद्वारे संकल्प करण्यात आले. तसेच उपस्थितांसाठी तज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य सल्ला देण्यात आला. विशेष म्हणजे,



हीलिंग साधनेचे परिणाम जाणून घेण्यासाठी पूर्व व पश्चात वैद्यकीय तपासणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासात प्रावीण्य मिळविण्यासाठी विशेष साधना सत्र आयोजित करण्यात आले होते. अनेक पालकांनी आपल्या मुलांसह सहभाग नोंदवून सकारात्मक ऊर्जा, मानसिक स्थैर्य आणि आत्मविश्वासात वाढ झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. सहभागींनी तणाव व्यवस्थापन, भावनिक संतुलन, झोपेची गुणवत्ता आणि नातेसंबंधांमध्ये सकारात्मक बदल जाणवल्याचे सांगितले. अनेकांनी अशी दिव्य साधना आयुष्यात प्रथमच अनुभवायला मिळाली, असे म्हणत आयोजकांचे आभार मानले

# गझलमित्र पुरस्काराने नमुंमपा उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड सन्मानित

**नवी मुंबई : बातमीदार**

रंगतसंगत प्रतिष्ठान (पुणे) आणि करम प्रतिष्ठान (पुणे) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गझलमित्र पुरस्कार प्रदान सोहळा आणि एक दिवसीय भव्य राज्यस्तरीय मराठी गझल संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात रविवारी (ता.१५) पार पडले. या राज्यस्तरीय ग़ज़ल संमेलनात नवी मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त अतिक्रमण डॉ. कैलास गायकवाड यांना 'ग़ज़लमित्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

योग्य व्यक्ती, योग्य संस्था, योग्य पुरस्कार हे स्मीकरण पुन्हा पुन्हा प्रत्ययाला येणं, हे मराठी ग़ज़ल क्षेत्राचं देखील यश आहे.या सोहळ्याचा साक्षीदार होता आलं, ही अभिमानाची




बाब आहे, अशी प्रतिक्रिया डॉ.कैलास गायकवाड यांनी दिली.यावेळी भूषण कटककर यांनी त्यांच्या भाषणात मांडलेला मराठी ग़ज़लचा समकालीन आढावा आणि व्यक्त केलेल्या चिंता व उपाययोजना ही संपूर्ण मांडणी प्रत्येक ग़ज़लकाराला अंतर्मुख ठरली आहे.

या कार्यक्रमाचे आयोजक ॲड. प्रमोद आडकर, भूषण कटककर, प्रज्ञा महाजन, मैथिली आडकर तर.अध्यक्ष स्थानी डॉ. सदानंद मोरे होते. नियोजन प्रमुख वैशाली माळी होत्या. या कार्यक्रमात निरुपमा महाजन, वैभव कुलकर्णी, मुक्ता भुजबले, अश्विनी जगताप यांचा विशेष सहभाग होता.

या कार्यक्रमात ज्येष्ठ गझलकार प्राचार्य सतीश देवपूरकर, ज्येष्ठ गझलकार मसूद पटेल, ज्येष्ठ कवयित्री व साहित्यदीप प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ज्योत्स्ना चांदगुडे यांना देखील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.रंगत-संगत गझल संमेलनात प्रभा सोनवणे (अध्यक्षा), डॉ. मृदुला खैरनार कुलकर्णी, सुनीति लिमये, मीना शिंदे, सुजाता पवार, स्वाती यादव वैजयंती आपटे यांचा सहभाग होता.करम गझल संमेलनात मिलिंद छत्रे (अध्यक्ष), प्रज्ञा महाजन, चैतन्य कुलकर्णी, डॉ. मंदार खरे, नचिकेत जोशी, माधुरी डोंगळीकर, शीला टाकळकर प्राजक्ता वेदपाठक, गझलविधा गझल संमेलनात प्रमोद खराडे (अध्यक्ष), प्रशांत पोरे, विशाल राजगुरू, जनार्दन म्हात्रे, अभिजीत काळे, गणेश भोसले, कुमार चव्हाण, निलोफर शेख वासंती वैद्य सहभाग होता.

# दिघाटीच्या उपसरपंचपदी भाजपच्या शितल पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील दिघाटी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक सोमवारी (दि.१६) झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या शितल शाम पाटील यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली आहे.




याबद्दल त्यांना पुढील वाटचालीसाठी रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य व पनवेल पंचायत समितीचे माजी उपसभापती जीवन म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ते म्हणाले की, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप नेते जे.एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी तसेच प्रीतम म्हात्रे यांनी जो लोकसेवेचा वसा घेतला आहे तो शितलताई त्यांच्या कारकीर्दीत विकास कामात कोणतेही राजकारण न आणता पूर्ण करतील.

शितल पाटील यांना शुभेच्छा देण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, दिघाटीच्या सरपंच रजनी ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य अमित पाटील, मालती पाटील, नयना म्हात्रे, वेश्वी ग्रामपंचायतीच्या सदस्या सोनाली विलास पाटील, माजी उपसरपंच दत्तात्रेय पाटील, केळवणे पंचायत समिती विभागीय माजी अध्यक्ष हिरामण ठाकूर, माजी सरपंच सपना जीवन म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण ठाकूर व मयुरी गावंड, माजी सरपंच प्रतिभा हनुमान पाटील, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते हिरामण पाटील, अशोक पाटील, सुरेश पाटील, विकास पाटील आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये शिर्डी पादुका दर्शनासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निमंत्रण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथे येणाऱ्या श्री शिर्डी पादुका दर्शनानिमित्त सोमवारी (दि.१६) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन दर्शन व पूजनाचे निमंत्रण देण्यात आले.



९० व्या जयंती उत्सवानिमित्त एच.एस सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या श्री साई मंदिर, श्री साईनारायण बाबा आश्रम पनवेल येथे श्री शिर्डी साईबाबांच्या पादुकाचे दर्शन १८ ते २० फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. यासंपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

या सोहळ्याला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सहपत्नीक पादुका व पूजनासाठी यावे यासाठी ट्रस्टचे पदाधिकारी रामलाल चौधरी, राम थदानी व साईसेवक संजय कदम यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन दिले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले.

## निवडक

### साईनगर येथून तरुणी बेपत्ता



**पनवेल :** पनवेल शहरातील साईनगर परिसरातून एक २६ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना घडली असून याघटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आफरीन कच्छी असे या तरुणीचे नाव असून तिची उंची अंदाजे पाच फूट एक इंच, रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, बांधा मजबूत, अंगात काळा व पांढरा टॉप व प्लाझो पँट घातलेली असून त्यावर काळा बुरखा घातलेला आहे. या तरुणीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार एस.एस. कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मोरबे परिसरातून स्कूटीची चोरी

**पनवेल :** जवळील मोरबे धरणाच्या बाजूला असलेल्या घरासमोरील स्कूटी चोरीला गेल्याप्रकरणी राम कातकरी (रा. रोडपाली) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यश दाभोळकर हे डॉक्टर होमी भाभा रोड मुंबई या ठिकाणी राहतात. त्यांनी छोटा मोरबे डॅम भाडेतत्त्वावर घेतला आहे. त्या ठिकाणी ते मत्स्यपालन करतात. या ठिकाणी वापरण्यासाठी त्यांनी घराजवळच स्कूटी उभी केली होती. ती चोरीला गेली असून संशियत राम कातकरीही गायब असल्याने आणि त्याचा संपर्कही होत नसल्याचे आढळले.

# पनवेल पत्रकार मंचतर्फे महापौर नितीन पाटील यांचा सत्कार



**पनवेल : वार्ताहर,**
**कळंबोली : बातमीदार**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने पनवेल महापालिकेच्या महापौरपदी विराजमान झालेले नितीन पाटील यांचा शाल पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार केला. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचातील तमाम सदस्यांनी या वेळी नितीन भाई पाटील यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

महापौर नितीन पाटील यांनी या वेळी मंचातील तमाम सदस्यांसोबत वार्तालाप करताना त्यांची ध्येयधोरणे व आगामी व्हिजन शेअर केले. या वेळी नितीन पाटील यांनी पनवेल महानगरपालिका हद्दीतील स्वच्छता व्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्य सुविधांना प्राधान्य देऊन त्या अधिकाधिक बळकट करणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविक सादर करताना सल्लागार मंदार दोंदे म्हणाले की, आज खरे तर आम्ही तमाम पनवेलवासीयांचे अभिनंदन करत आहोत कारण आज पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना एक सजग, प्रामाणिक आणि ट्वेंटी फोर बाय सेवन उपलब्ध असणारा महापौर लाभला आहे. नजीकच्या काळात पनवेल तालुका पत्रकार मंचातील सदस्यांसोबत एक व्यापक वार्तालाप कार्यक्रम घेणार असून त्याच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका हद्दीतील हर एक समस्येचा निपटारा करण्यासाठी महापौर नितीन पाटील आणि पनवेल तालुका पत्रकार विकास मंच संयुक्त विद्यामाने प्रयत्न करणार असल्याचे या सत्कार सोहळ्यात जाहीर करण्यात आले.

या वेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार विवेक पाटील संजय कदम, मंदार दोंदे, उपाध्यक्ष दीपक घोसाळकर,खजिनदार दत्ता कुलकर्णी, प्रवीण मोहोकर, राजू गाडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांचा वाढदिवस सोमवारी सामाजिक बांधिलकी जपत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून मंगेश शेलार यांनी करंजाडे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून एक स्तुत्य उपक्रम राबवला. दरम्यान, सरपंच शेलार यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत केक कापून सरपंच मंगेश शेलार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमावेळी भाजपचे करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, ग्रामपंचायत सदस्य नंदू भोईर, नाथाभाई धारवाड, रवी रजपूत, सुनील भोईर, कैलास शेलार, प्रशांत म्हात्रे, तुषार नागे यांच्यासह शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.



# सीकेटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा मुंबईत शैक्षणिक दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील लेखा व वित्त विभागामार्फत तृतीय वर्ष (लेखा व वित्त) विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी (दि.१३) मुंबई बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज व भारतीय रिझर्व्ह बँक मुद्रा संग्रहालय येथे शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती.



ही भेट उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात झाली.

विद्यार्थ्यांनी प्रथम बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज (BSE) येथे भेट दिली. तसेच विद्यार्थ्यांना शेअर बाजाराचा इतिहास, व्यवहार प्रणाली, निर्देशांक, डिमॅट खाते, ऑनलाईन ट्रेडिंग प्रक्रिया तसेच गुंतवणूकदार संरक्षण उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना शेअर बाजाराची प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी भारतीय रिझर्व्ह बँक मुद्रा संग्रहालय येथे भेट देऊन भारतीय चलनव्यवस्थेचा इतिहास, प्राचीन नाणी व नोटांचा संग्रह, चलननिर्मिती प्रक्रिया तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेची मौद्रिक भूमिका याविषयी माहिती घेतली. डिजिटल गॅलरी व माहितीपटांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक समृद्ध झाले.

या शैक्षणिक भेटीचे नेतृत्व विभागप्रमुख डॉ. निलेश कोळी यांनी केले. तसेच सहाय्यक प्राध्यापक मनोज सुपेकर, मोनिका भालेराव व आलोक भानुशाली यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या योग्य नियोजनामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाला.

विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून भविष्यात अशा अधिक शैक्षणिक भेटी आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर साहेब तसेच संस्थेचे सचिव एस.टी गडदे आणि प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# रिक्षाच्या धडकेने वृद्ध जखमी

**पनवेल :** रिक्षाने ज्येष्ठ नागरिकाला दिलेल्या धडकेत ७२ वर्षीय चिंतामण शंकर कांबळे हे जखमी झाले. अपघाताप्रकरणी रिक्षाचालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चिंतामण कांबळे (रा. बोरले) हे मॉर्निंग वॉक करून शेडुंग सर्कलजवळ बस थांब्याजवळ पुणे लेनवर शेडंग या ठिकाणी आले असता मागून आलेल्या रिक्षाने त्यांना ठोकर दिली. अपघातात चिंतामण कांबळे हे रस्त्यावर पडले. त्यानंतर रिक्षाचालक मदत न करता पळून गेला. या अपघातात त्यांच्या कमरेला गंभीर दुखापत झाली.



**पनवेल : पंचायत समितीच्या पळस्पे गणातून भाजपचे राजेंद्र पाटील निवडून आले आहेत. याबद्दल त्यांचे व भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचे चिखले गावातील भाजप कार्यकर्त्यांनी भेट घेऊन अभिनंदन केले. या वेळी माजी सरपंच नामदेव पाटील, सदस्य मिलिंद शेळके, अविनाश पाटील, छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान अध्यक्ष प्रसाद बडे, माजी उपसरंपच रवींद्र गडकरी, रमेश गडकरी, ज्येष्ठ कार्यकर्ते नामदेव पाटील, भगवान पाटील, युवा कार्यकर्ते योगेश गायकर, धीरज गडकरी, प्रशांत पाटील, अंकुश पाटील, गणेश बडे, साहिल शेळके, संदेश पंडित आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# फुंडे महाविद्यालयात वीर वाजेकर पुण्यतिथी, पारितोषिक वितरण

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथे वीर वाजेकर पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर, यांनी केले.

संस्थापकीय चेअरमन व वीर वाजेकर कॉलेज व उपाध्यक्ष पी.जे. पाटील यांनी रयत शिक्षण संस्था आणि वीर वाजेकर यांच्या सोबत काम करतानाचे विविध अनुभव सांगितले. कार्याध्यक्षा डॉ.श्रेया पाटील यांनी महाविद्यालयाचा शैक्षणिक, सांस्कृतिक व एकूणच कार्याचा सविस्तर अहवाल मांडला. महाविद्यालयातील १३ प्राध्यापकाना संशोधन, पुस्तक लेखन प्रकारात विशेष सन्मानित करण्यात आले. प्रा.देवेंद्र कांबळे यांनी क्रीडा अहवाल वाचन केले.



मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. क्रीडा, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. डॉ.सुजाता पाटील यांनी सांस्कृतिक विभागाचा अहवाल वाचन केले. महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे डीप फ्रीज व प्राणिशास्त्राच्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास एक फ्रिज तीन पंखे व ४० भिंतीवरची घड्याळे भेट म्हणून दिली. कार्यक्रमास तू. ह. वाजेकर हायस्कूलचे चेअरमन कृष्णाजी कडू, महाविद्यालय विकास समिती सदस्य सुधीर घरत, बी.बी.साळुंखे, परेश ठाकूर, संकेत घरत, कुणाल पाटील, विजय भोईर, काशीबाई ठाकूर, नितीन कमलाकर ठाकूर, यशवंत ठाकूर, सुरेश म्हात्रे, दर्शन घरत, प्रभाकर पाटील, रवी वाजेकर, वसंत तांडेल, राजेश ठाकूर, केशव कडू, शैला पाटील तसेच महालण विभागातील विविध प्रतिष्ठीतउपस्थितहोते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुजाता पाटील प्रा प्रांजल भोईर व प्रा.योगेश कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन सदानंद म्हात्रे यांनी केले.

# सीकेटी महाविद्यालयात कौन्सेलिंग सेलतर्फे ‘हेल्दी हर’ कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये ५ ते ६ फेब्रुवारी २०२६ रोजी कौन्सेलिंग सेलच्या वतीने हेल्दी हर (HEALTHY HER) हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.




कार्यक्रमाची सुरुवात कौन्सेलिंग सेलतर्फे आमंत्रित पाहुणे डॉ. क्रांती फडणीस (स्त्रीरोगतज्ञ) आणि डॉ. दीपा कला (स्त्रीरोगतज्ञ), महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील, विज्ञान विद्याशाखा प्रभारी प्रो. डॉ.ज्योत्स्ना ठाकूर व समुपदेशन विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांच्या स्वागताने झाली. मानसरंग संवादक प्रज्ञा, महेक, मुस्कान, सिद्धी यांनी ही जबाबदारी पार पडली.

प्रमुख पाहुणे डॉ. क्रांती फडणीस आणि डॉ. दीपा कला यांनी निरोगी आयुष्याच्या सवयी आणि योग्य आहार ह्या विषयाने केली. या कार्यक्रमात योग आणि व्यायामाचे महत्व हे प्रात्यक्षिके घेऊन विद्यार्थ्यांकडून करून घेतले. सत्राची सांगता मुलींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी आणि मनातील प्रश्न विचारून झाली. दुसऱ्या दिवशी डॉ.दीपा कला यांनी सजगता/ माइंडफुलनेस तसेच स्त्रीयांचे आरोग्य ह्याबद्दल फ्लिप चार्ट्स दाखून प्रात्यक्षिके घेऊन चर्चा घेण्यात आली.

या कार्यक्रमासाठी बॅचलर अँड मॅनेजमेंट स्टडीज कॉमर्स विभागाच्या प्रा. मेनका नलावडे, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. सोनाली हुद्दार, बॅचलर अकाउंटिंग अँड फायनान्स प्रा. मोनिका, संगणक विज्ञान विभागाच्या प्रा. भाग्यश्री दामले व ५० विद्यार्थीनी सहभाग घेतला होता. मानसरंग संवादक –विद्यार्थी वर्ग प्रज्ञा, महेक, मुस्कान, सिद्धी, लविना यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांचे ही संधी दिल्याबद्दल आभार मानत तसेच समुपदेशन विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली.

## संपादकीय

# लांगुलचालनाचा खेळ

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानासंदर्भात केलेल्या वक्तव्याचे समर्थन होऊच शकत नाही. टिपू सुलतानाची छत्रपती शिवाजी महाराजांशी तुलना करण्याचा प्रयत्न त्यांनी का बरे करावा? निव्वळ इंग्रजांविरोधात लढला होता म्हणून 'हिंदवी स्वराज्या'ची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवरायांशी कुणाची बरोबरी होऊ शकते? ही अशी तुलना करण्याचा आटापिटा करण्यामागे काँग्रेस पक्षाची कोणती हतबलता आहे असे म्हणावे.

**राज्यात गेले दोन दिवस टिपू सुलतानावरून पुन्हा एकदा राजकारण तापले आहे. मालेगाव महानगरपालिकेत उपमहापौरांच्या दालनात टिपूचे तैलचित्र लावण्यात आले आणि वाद उफाळला. विविध पक्षांकडून त्यावर टीकात्मक प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्यानंतर हे तैलचित्र हटवण्यात आले. पण पाठोपाठ काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्याने नव्या वादाला तोंड फुटले. ज्या पद्धतीने शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्याचा विचार दिला. त्याचप्रमाणे त्यांच्यानंतर अनेक वर्षांनी टिपू सुलतान याने इंग्रजांच्या विरोधात लढा पुकारला होता. त्याअर्थाने टिपू सुलतान यांना आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे समकक्ष म्हणून बघितले पाहिजे असा दावा सपकाळ यांनी केला. त्यांच्या या संतापजनक विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जोरदार टीका केली. छत्रपती शिवराय हे सामान्य जनतेचे राज्य निर्माण करणारे होते. हजारो-लाखो हिंदूंची हत्या करणाऱ्या टिपू सुलतानाची शिवरायांशी तुलना करून दोघांनाही सारखाच सन्मान द्या म्हणणे यापेक्षा जास्त लांगुलचालन आपण जन्मात पाहिलेले नाही, असे म्हणत, छत्रपती शिवरायांशी टिपूची तुलना केल्याबद्दल सपकाळ यांनी माफी मागितली पाहिजे अशी मागणी फडणवीस यांनी केली. हा जो नवा इतिहास हे लिहिताहेत तो महाराष्ट्र खपवून घेणार नाही असा इशाराही फडणवीस यांनी दिला. यापार्श्वभूमीवर पुण्यातील काँग्रेस भवनासमोर सपकाळ यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ भाजपकडून आंदोलन केले गेले. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमधील शाब्दिक वादाचे रुपांतर दगडफेकीत झाले आणि मोठा राडा झाला. त्यावर सपकाळ यांनी नंतर उलटी बोंब मारली. आपल्या वक्तव्याची मोडतोड करून 'ध'चा 'मा' करून देवेंद्र फडणवीस यांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत असा उलटा कांगावा करणारी पोस्ट सपकाळ यांनी एक्सवर केली. वास्तविक सामाजिक तेढ निर्माण होईल असे विधान करण्याचे टाळण्याचे भान सपकाळ यांनी ठेवायला हवे होते. ते न ठेवल्यानेच सपकाळ यांच्यावर सर्व स्तरातून टीका करण्यात आली. भारतीय जनता पक्ष व हिंदुत्ववादी संघटनांनी सपकाळांविरोधात टीकेची झोड उठवली. मराठा ठोक मोर्चाने सपकाळ यांच्या तोंडाला काळे फासणाऱ्याला एक लाखांचे बक्षीस जाहीर केले. तर सिनेइंडस्ट्रीतल्या कलाकारांनी देखील यावर भाष्य केले. 'आज महाराज असते तर अशांना टिपून टिपून मारले असते' अशी पोस्ट लोकप्रिय मराठी अभिनेता अभिजीत केळकर याने इन्स्टाग्रामवर शेअर केली. सपकाळ यांच्या टिपूविषयीच्या विधानात काँग्रेस पक्षाची नेहमीची लांगुलचालनाची हतबलताच दिसते. छत्रपती शिवराय हे या महाराष्ट्राचे आराध्यदैवत आहेत. त्यांच्याशी कुणाची तुलना करावी याचे काही भान? की हीच ती काँग्रेस पक्षाची कथित धर्मनिरपेक्षता? हेच अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाचे धोरण सातत्याने राबवल्यामुळेच तर काँग्रेस पक्षाला देशभरातील जनतेने गेली काही वर्षे सातत्याने नाकारले आहे. तरीही आपले अस्तित्व टिकवण्याच्या प्रयत्नात काँग्रेस पक्ष पुन्हा पुन्हा एका विशिष्ट धर्माच्या लांगुलचालनाचाच आधार घेताना दिसतो याला काय म्हणावे?**

# बंजारा समाजाचे शीख धर्मातील महत्त्व



भारतीय सामाजिक-आर्थिक इतिहासात बंजारा समाजाचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्ययुगीन काळात संपूर्ण भारतभर व्यापार, वाहतूक आणि पुरवठा व्यवस्था सांभाळणारा हा समुदाय केवळ आर्थिकच नव्हे, तर धार्मिक-सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वाची भूमिका बजावतो. शीख इतिहासातील लखीशाह (लाखा) बंजारा यांचे योगदान हे त्याचे सर्वोत्तम उदाहरण मानले जाते. श्री गुरु तेगबहादूर साहेब जी यांच्या शहीदीनंतर त्यांची केलेली सेवा, तसेच त्या काळातील बंजारा समाजाचे व्यापारी सामर्थ्य, हे दोन्ही घटक शीख-बंजारा संबंधांचे सशक्त द्योतक आहेत.

**लखीशाह बंजारा यांचे शीख समाजातील महत्त्व**

इ.स. १६७५ मध्ये मुघल सत्तेने श्री गुरु तेगबहादूर साहेबजी यांना दिल्लीत शहीद केले. त्या काळात भयावह वातावरण होते; कोणालाही गुरुजींच्या पार्थिवाला स्पर्श करण्याची हिंमत होत नव्हती. अशा वेळी लखीशाह बंजारा, जे एक नामांकित व्यापारी व कारवाँ प्रमुख होते, त्यांनी एकाच वेळी हजारो बैलगाड्या एकत्रित केल्या. आपल्या जीवाची पर्वा न करता गुरुजींचे पवित्र शरीर आपल्या गाडीत लपवून दिल्लीतील रायसीना परिसरात नेले. एकाच वेळी आलेल्या हजारो बैलगाड्या त्यांनी उडालेला धुराळा यामुळे त्यांच्या मनातील पवित्र कार्य कोणाच्या लक्षात आले नाही. नंतर आपल्या घराला आग लावून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले, जेणेकरून मुघल अधिकाऱ्यांना संशय येऊ नये. आजचे गुरुद्वारा रकाब गंज साहिब हे त्याच बलिदानाची साक्ष देणारे पवित्र स्थळ आहे. या ठिकाणी एक भव्य सभागृह आजही त्यांच्या नावाने उभे आहे. या घटनेमुळे लखीशाह बंजारा हे शीख परंपरेत त्याग, निष्ठा आणि मानवतेचे प्रतीक ठरले आहेत.

**श्री गुरु तेगबहादूर साहेबजींच्या कार्यात सहभाग**

गुरु तेगबहादूर साहेबजी हे धार्मिक स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि सर्वधर्मसमभावाचे पुरस्कर्ते होते. काश्मिरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी त्यांनी प्राणांची आहुती दिली. लखीशाह बंजारा यांनी केलेली सेवा ही गुरुजींच्या मूल्यांचीच पुनरावृत्ती होती. धर्मापलीकडे जाऊन मानवतेसाठी उभे राहणे, ही शिकवण त्यांनी आपल्या कृतीतून दिली.म्हणूनच शीख परंपरेत बंजारा समाजाला सेवाभावी सहचर म्हणून सन्मान दिला जातो.

**३५० वर्षांपूर्वीचा बंजारा समाजाचे व्यापारी महत्त्व**

मुघल काळात बंजारा समाज हा उपखंडातील सर्वात मोठा स्थलांतरित व्यापारी वर्ग मानला जात असे. धान्य, मीठ, कापड, कच्चा माल आणि लष्करी पुरवठा हे मुख्य व्यवसाय. त्या काळातील असुरक्षितता आणि लुटालुट लक्षात घेऊन या समाजाने समुदायातून व्यापार केला.स्वसंरक्षण आणि त्यासाठी आवश्यक शस्त्रकला यामध्ये हा समाज पारंगत होता. भटकंती संदर्भातील रस्ते, जोखीम आणि प्रसंगी लढण्याचे कसब त्यांना अवगत होते. देशाटन करण्याची कला या समुदायाने विकसित केली होती. मोठ्या बैलगाड्यांच्या तांड्यांद्वारे (कारवाँ) हजारो किलोमीटरचा प्रवास केला जात असे.

मुघल लष्कराचा अन्नपुरवठा प्रामुख्याने बंजाऱ्यांकडून होत असल्याची नोंद तत्कालीन प्रशासनिक कागदपत्रांत आढळते. दुष्काळी परिस्थितीतही अन्नधान्याची वाहतूक करून त्यांनी राजकारभार स्थिर ठेवला.

**तत्कालीन व्यापार व्यवस्था**

बंजारा समाजाची व्यापार व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध होती. प्रत्येक तांड्याला नायक, कारभारी आणि राखणदार असत. मार्ग, पाणवठे, विश्रांतीस्थळे यांची पूर्वनियोजित माहिती त्यांना असे. व्यवहार बहुधा विश्वासावर आधारित, पण ठराविक संकेत आणि मौखिक करारांवर चालत. ही व्यवस्था आजच्या लॉजिस्टिक्स सिस्टीमची आद्य आवृत्ती मानली जाते.त्यांच्या तांड्याची रचना व त्यातून कामाचे वाटप यामुळे अनेक वर्ष हा समुदाय शिस्तबद्ध व्यापारी समुदाय म्हणून सन्मानित केला जातो.या समाजाकडे असणाऱ्या दळणवळण,मनुष्यबळामुळे तत्कालिन राजकीय चौकटीत या समाजाला फार महत्व प्राप्त झाले होते.

**हिंदू समाजातील बंजारा समुदायाचे महत्त्व**

बहुसंख्य बंजारा समाज हिंदू परंपरेत मोडतो.सण, उत्सव, चालीरीती आणि त्यांचे वार्षिक नियोजन यामुळे या समाजाच्या मान्यतांना विविध समाजात प्रतिष्ठा प्राप्त होती.स्वतःची भाषा, संगीत, खानपान पद्धती,आयुर्वेद व औषध शास्त्राचे उत्तम जाण यामुळे त्यांना अन्य समाजात प्रतिष्ठा होती.त्यांनी देशभरच्या ग्रामीण-शहरी भागांना जोडण्याचे काम केले. स्थानिक बाजारपेठा, मंदिरे, यात्रास्थळे आणि राजकीय केंद्रे यांना आवश्यक वस्तू पुरवून सामाजिक एकात्मता वाढवली. देशभरातील स्वतःच्या समाजातील उत्सव सोबतच अन्य धर्मीयांच्या उत्सवाची माहिती व त्या दृष्टीचे बिनचूक वार्षिक नियोजनामुळे बंजारा समाज हा केवळ व्यापारी नसून, सांस्कृतिक दुवा ठरला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**भाषा, पेहराव आणि अखिल भारतीय सूत्र**

बंजारा समाजाची गोरबोली (लामणी/लभाणी) ही भाषा संपूर्ण भारतात वेगवेगळ्या प्रादेशिक प्रभावांसह आढळते. हा एक अखिल भारतीय भाषिक सूत्र आहे. स्त्रियांचा रंगीबेरंगी पोशाख, भरजरी दागिने, पुरुषांचा साधा पण प्रवाससुलभ पेहराव, हे सर्व त्यांच्या स्थलांतरित जीवनशैलीशी सुसंगत होते. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत या समाजाने आपले वैशिष्ट्य, भाषा, पेहराव, खानपान यामध्ये एकसूत्री पण ठेवले. कोणत्याही ठिकाणच्या बंजारा समाजाच्या भाषा आणि राहणीमान हे एक दुसऱ्यांसोबत कितीही वर्ष विलग राहिले तरी बदलू न देण्याची हजारो वर्ष परंपरा त्यांनी जपली. अनेक धर्माचे अनेक पंथाचे व चालीरितीचे शासन आले तरी त्यांनी आपली संस्कृती जतन केली. त्यामुळे हा समाज सर्वकालीन समाज व्यवस्थेत देशाच्या कानाकोपऱ्यात आपल्या सन्मानाने आणि लढवय्या बाण्यामुळे तटस्थ आणि वेगळेपण अधोरेखीत करीत गेला.

**लाखा बंजारा यांचे व्यापारातील स्थान**

लखीशाह बंजारा हे केवळ धार्मिक सेवक नव्हते; ते त्या काळातील यशस्वी व्यापारी होते. दिल्लीसारख्या राजधानीत त्यांचे निवासस्थान आणि व्यापारी जाळे होते. तीन ते चार शतकांचा व्यापाराचा त्यांचा अनेक पिढ्यांचा अनुभव होता. आपल्या मेहनतीने, प्रामाणिकपणाने आणि व्यापार पूरक साहित्य-सुविधांनी त्यांनी गौरवशाली परंपरा निर्माण केली होती. स्वतःचा एक समुदाय, व्यापाराचा वकूब, शब्दाला जपण्याची स्थिरता, धर्माचा स्वाभिमान, व्यवहारातील पारदर्शिता, वक्तशीरपणा आणि लढाऊ वृत्तीमुळे आदर युक्त दहशत या समाजाची तत्कालीन व्यवस्थेत होती. त्यामुळेच गुरुजींच्या पार्थिवाला सुरक्षितपणे हलवणे त्यांना शक्य झाले.

**शीख आणि बंजारा समाजाचा संबंध**

लखीशाह बंजारा यांच्या कृतीमुळे शीख-बंजारा संबंध दृढ झाले. पुढील काळात अनेक बंजारा कुटुंबे शीख गुरुद्वारांच्या सेवेत सहभागी झाली. देशभरातील दोन्ही समाजांचा वावर. ठिकठिकाणी व्यापारासाठी व धर्मप्रसारासाठी जाणारे जत्थे व तांडे यातील स्थलांतर हा समान धर्म. विविध वातावरणात अस्तित्व टिकवण्याची परस्पर सांगड. लंगर व्यवस्था, प्रवासातील मदत आणि आपत्कालीन सेवा या क्षेत्रांत दोन्ही समाजातील साम्य या समुदायाला सहजीवनासाठी उपयुक्त ठरला. त्यामुळे देशात या दोन्ही समुदायाने तत्कालीन व्यवस्थेत समान धर्मीय म्हणून मान्यता प्राप्त केले होती. ही व्यवस्था दोन्ही समुदायांच्या संबंधाला काळाच्या कसोटीवर सिद्ध करणारी ठरली आहे.

**श्री गुरु ग्रंथ साहेब ग्रंथामध्ये आदराने उल्लेख**

गुरुजींच्या शहादतीमध्ये या समाजाने दाखवलेल्या अतुलनीय पराक्रमाचा उल्लेख शिखांच्या पवित्र श्री गुरु ग्रंथ साहेब जी ग्रंथात आहे. तथापि, गुरुमुखी या लिपीमध्ये असलेल्या या पवित्र ग्रंथात थेट बंजारा असा उल्लेख क्वचित आढळतो; मात्र सेवा, त्याग, समता आणि मानवता ही मूल्ये बंजारा समाजाच्या जीवनपद्धतीशी सुसंगत आहेत. शीख परंपरेतील सेवाभावात बंजारा समाजाचा आत्मा प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्यामुळे शेकडो वर्षांपासून परस्परांच्या मान्यतेत व अस्तित्वात दोन्ही समाजाने एकमेकांचा आदर केला आहे.

लखीशाह बंजारा यांचे बलिदान, बंजारा समाजाचे व्यापारी सामर्थ्य आणि शीख धर्माशी असलेले नाते हे सर्व भारतीय इतिहासातील सामाजिक ऐक्याचे उत्तम उदाहरण आहे. धर्म, जात किंवा व्यवसाय यापलीकडे जाऊन मानवतेसाठी उभे राहणे हीच या परंपरेची खरी देणगी आहे.

**-प्रवीण टाके,**
**उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**




# व्हॉट्सॲप नोटिफिकेशनवरून स्पॅम नंबर 'असा' करा ब्लॉक

गेल्या काही महिन्यांत ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अनोळखी लोकांचे कॉल किंवा मेसेज आल्यानंतर हजारो लोकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आता या लोकांनी व्हॉट्सअॅपवरून फसवणूक करायला सुरुवात केली आहे. अनेक सिक्युरिटी फीचर्स असूनही लोक जाळ्यात अडकतात.




व्हॉट्सअॅपवर आता आपण कोणत्याही अनोळखी व्यक्तीला थेट नोटिफिकेशनवरून किंवा फोन लॉक असतानाही ब्लॉक करू शकतो.

जर कोणी तुम्हाला संशयास्पद मेसेज पाठवत असेल, जसं की कोणीतरी तुम्हाला फसवण्याचा प्रयत्न करत असेल किंवा तुम्हाला खोटी आश्वासनं देऊन आमिष दाखवत असेल, तर तुम्ही त्यांना दोन टॅपमध्ये लगेचच ब्लॉक करू शकता. नोटीफिकेशन आल्यावर रिप्लाय बटणाच्या पुढे ब्लॉक बटण असेल. तुम्ही तुमचा फोन लॉक केला असला तरीही तुम्ही त्या व्यक्तीला थेट नोटिफिकेशनमधूनच ब्लॉक करू शकता.

व्हॉट्सअॅपमध्ये ब्लॉक आणि रिपोर्टचा ऑप्शन आधीच होता, मात्र आता नवीन फीचर आलं आहे. याआधी व्हॉट्सअॅप अनोळखी नंबरवरून आलेल्या संशयास्पद मेसेजवर इशारे देत असे, पण त्यांना ब्लॉक करण्यासाठी चॅट ओपन करावं लागत होतं. यामुळे समस्या निर्माण झाल्या आणि अनेक वेळा लोक स्पॅम मेसेज ब्लॉक करत नाहीत किंवा चॅट उघडून ते ब्लॉक करायला विसरतात. आता नवीन फीचरमुळे थेट नोटिफिकेशन पाहून स्पॅमर्सना ब्लॉक करता येणार आहे, त्यासाठी फोन ओपन करण्याची गरज नाही.टू-स्टेप व्हेरिफिकेशन - तुमचं व्हॉट्सअॅप हॅक होण्यापासून वाचवण्यासाठी सहा अंकी पिन एंटर करा.

डिसेपियेरिंग ऑप्शन्स - फोटो, व्हिडीओ आणि व्हॉईस नोट 'व्ह्यू वन्स' म्हणजेच एकदाच पाहिले जाईल अशा पद्धतीने पाठवा. गोष्टी आणखी खासगी ठेवायच्या असल्यास डिसेपियेरिंग ऑप्शन्सचा वापर करा.

चॅट लॉक - तुम्ही तुमचे महत्त्वाचे चॅट वेगळ्या पासवर्डने लॉक करू शकता. जर कोणी तुमचा फोन पाहिला तरी तो ते चॅट्स पाहू शकणार नाही.

अनोळखी कॉलर - अनोळखी नंबरचा त्रास होऊ नये म्हणून ते सायलेंट करा. प्रायव्हसी चेकअप व्हॉट्सअॅपमध्ये प्रायव्हसी चेकअप नक्की करा. म्हणजे तुम्हाला कळेल की तुमच्यासाठी कोणते फीचर्स योग्य आहेत आणि तुम्ही ती चालू करू शकता.

# आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके



**निमित्त**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतीचे आद्य प्रवर्तक म्हणजे वासुदेव बळवंत फडके. आज त्यांची पुण्यतिथी...

वासुदेव फडके यांचे मूळ घराणे कोकणातील केळशी (रत्नागिरी जिल्हा) येथील. वासुदेवांचे आजोबा अनंतराव कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. दोन-तीन दिवस किल्ला तटवून अगतिक झाल्यावरच त्यांनी किल्ला १८१८मध्ये इंग्रजांच्या स्वाधीन केला. किल्ल्याजवळ असलेल्या पूर्वीच्या कुलाबा (आताच्या रायगड) जिल्ह्यातील शिरढोण गावी पुढे फडके कुटुंबाचे वास्तव्य झाले. बळवंतरावांचा मुलगा वासुदेव. त्याचा जन्म शिरढोण येथेच ४ नोव्हेंबर १८४५ झाला. प्राथमिक शिक्षण शिरढोण येथे झाले. १८५५-६० या पाच वर्षांत माध्यमिक शिक्षण कल्याण, मुंबई, पुणे या ठिकाणी झाले. घरगुती अडचणींमुळे किंवा शिक्षणाची आवड बेताची असल्यामुळे वासुदेव यांनी इंग्रजी पाचवीनंतर शिक्षण सोडले आणि नोकरीला सुरुवात केली. पहिली नोकरी जीआयपी रेल्वेत केली. वरिष्ठांपुढे उगाच विनम्र होण्याचा गुण अंगी नसल्यामुळे त्यांची रेल्वेमधली नोकरी सुटली व नंतरची ग्रँट मेडिकल कॉलेजमधील लेखनिकाची नोकरीही फार दिवस टिकली नाही. शेवटी १८६३मध्ये वासुदेव लष्कराच्या हिशेबी खात्यात आले. त्यात ते १८७९पर्यंत म्हणजे बंडाचा बावटा उभारीपर्यंत राहिले.

मुंबईहून फडके यांची बदली १८६५ साली पुणे येथे झाली आणि पुणे हीच त्यांची कर्मभूमी ठरली. कचेरीतील वातावरण यांत्रिक आणि वासुदेव यांची वृत्ती तर अत्यंत संवेदनशील. वेळेवर रजा मंजूर न झाल्यामुळे आजारी आईची भेट झाली नाही, तेव्हा वासुदेवांनी वरिष्ठांपर्यंत आपली तक्रार नोंदविली. त्यांच्या आयुष्याला क्रांतिकारक वळण लावणारी ही एक महत्त्वाची घटना होय.


पुण्यात सार्वजनिक सभेची स्थापना १८७१मध्ये झाली व तिच्यामार्फत महादेव गोविंद रानडे यांची स्वदेशी चळवळीवर दोन व्याख्याने झाली. ही व्याख्याने आणि देशी वर्तमानपत्रांचा प्रचार यांनी वासुदेवांच्या क्रांतिकारक वृत्तीला खतपाणी पुरविले. ते पुण्यात देशभक्तिपर व्याख्याने देऊ लागले. १८७६-७८ या दरम्यान महाराष्ट्रात दुष्काळ पडले. त्यातच प्लेग-पटकीसारख्या साथीच्या रोगांची भर पडली. गोरगरिबांचे पाण्याचे आणि खाण्याचे फार हाल झाले. शेतकऱ्यांची गुरेढोरे मेली. सर्वत्र मोठा हाहाकार उडाला. वासुदेव यांनी पपायी प्रवास करून लोकांची विपन्नावस्था पाहिली. या दुष्काळास, दारिद्र्यास परकीय सरकार जबाबदार आहे, त्याची हकालपट्टी करून आपल्या लोकांचे शासन स्थापन केले पाहिजे, असा प्रचार त्यांनी सुरू केला. इतरही प्रयत्न केले.

वासुदेवांचे सर्व गुप्त बेत कळल्यामुळे मे. डॅन्यीएलने निजामाचा पोलीस आयुक्त अब्दुल हक याच्या मदतीने वासुदेवांचा पाठलाग सुरू केला. फितुरीमुळे त्यांना त्यांचा ठावठिकाणा मिळाला आणि विजापूर जिल्ह्यातील देवर नावडगी या गावी त्यांना निद्रिस्त अवस्थेत त्यांच्या काही अनुयायांसह पकडण्यात आले पुणे येथे त्यांच्यावर खटला चालविण्यात आला. न्या. न्यूनहॅम यांनी त्यांना जन्मठेपेची -काळ्या पाण्याची शिक्षा फर्मावली. पुढे त्यांची रवानगी एडनच्या तुरुंगात झाली. क्षयरोगाने त्यांना पछाडले. त्यातच अखेरीस त्यांनी अन्नग्रहण सोडले. ते कारावासातच १७ फेब्रुवारी १८८३ रोजी मरण पावले.

(साभार : मराठी विश्वकोष)

## चित्र रंगवा








# मनुक्यांच्या प्रकारानुसार विविध आरोग्यदायी फायदे

मनुका खाण्याचे अनेक फायदे आहेत. त्यामध्ये विविध प्रकारचे गुणधर्म आढळतात. लोहाची कमतरता असेल तर मनुका खाण्याचा सल्ला दिला जातो. पोटाशी संबंधित काही समस्या असतील तरी देखील मनुका खाण्याचा सल्ला दिला जातो. मनुक्यात फायबर आणि काही वेगळ्या जीवनसत्त्वांमुळे तुम्ही ते वेगवेगळ्या परिस्थितीत खाऊ शकता.

**१. काळा मनुका:** काळा मनुका हा सामान्यतः सर्व घरांमध्ये असतो. हे द्राक्षांपासून तयार केले जातात. सुकल्यानंतर त्याचा रंग गडद होतो, जे खाल्ल्याने केस गळत नाहीत. आपले आतडे स्वच्छ करते आणि त्वचेचे आरोग्यदेखील सुधारते.

**२. हिरवा मनुका:** हिरवे मनुके पातळ असतात. आकारानेदेखील ते लांब असतात. गडद हिरव्या रंगाचे हे मनुके रसाळ असतात. यात फायबर आणि पोषक तत्व भरपूर असतात, जे हृदयासाठी चांगले असतात. निमियाला प्रतिबंध करण्याचे ते काम करतात. पचनासदेखील मदत करतात.

**३. लाल मनुका:** लाल मनुका हा स्वादिष्ट मनुका आहे, जो लाल द्राक्षांपासून तयार होतो. हे आकाराने मोठे असतात. मधुमेहाचा धोका कमी करण्यात ते मदत करतात. दातांसाठीदेखील चांगले असतात. याशिवाय त्याच्या सेवनाने दृष्टीदेखील सुधारते.

**४. सोनेरी मनुका:** थॉम्पसन सीडलेस द्राक्षांपासून खास तयार केलेल्या तुर्की हिरव्या द्राक्षांवरून सुलताना मनुका हे नाव देण्यात आले आहे. हा मनुका रक्तातील साखर नियंत्रित करतो. याशिवाय जळजळ कमी करतो. पचनासदेखील तो मदत करतो.

मनुक्याचे अनेक प्रकार आहेत. फनुका हा फार गोड नसतो. काळ्या रंगाच्या कोरिंथ द्राक्षांपासून तयार केलेले मनुका खाल्ल्याने घसा खवखवणे बंद होते. याशिवाय रोगप्रतिकारक शक्तीदेखील वाढते. रक्तदाब कमी होतो. मनुका म्हणजे वाळलेली द्राक्षे असतात, जी द्राक्षांपेक्षा आकाराने लहान असतात. मनुका नैसर्गिकरित्या महिलांच्या आरोग्यासाठी खूप चांगले असतात.

## रेवस ते रेड्डी सागरी महामार्गाच्या

# नूतनीकरण कामामुळे वाहतूक कोंडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रेवस ते रेड्डी सागरी महामार्गाच्या रुंदीकरण व नूतनीकरणाचे काम सध्या अलिबाग ते नागाव परिसरात सुरू आहे, मात्र या कामामुळे अलिबाग ते बेलकडे दरम्यान सातत्याने वाहतूक कोंडी होत असून सोमवारी बारावीच्या विद्यार्थ्यांना याचा फटका बसला. कोंडीमुळे अनेक विद्यार्थी रस्त्यात अडकून पडले. परीक्षा काळात या मार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने अलिबाग ते नागाव दरम्यान रस्ता रुंदीकरण व नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे अलिबाग–नागाव तसेच अलिबाग–रोहा मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र आहे. सोमवारी सकाळच्या सत्रात कुरळ आणि बेलकडे परिसरात वाहनांची प्रचंड कोंडी झाली. बेलकडे ते अलिबाग हे सहा किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी दीड ते दोन तास लागत होते. याचा फटका शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह नोकरदारांनाही बसला.

बारावीच्या परीक्षेसाठी निघालेले अनेक विद्यार्थी वाहतूक कोंडीत अडकले. परीक्षा वेळ जवळ येत असल्याने त्यांची घालमेल वाढली. वाहतूक नियमनासाठी कोणतीही यंत्रणा तत्काळ कार्यरत नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये धास्तीचे वातावरण होते. अलिबागकडे कामानिमित्त निघालेले शेकडो दुचाकीस्वारही कोंडीत अडकून पडले. अखेर वाहतूक पोलिसांना पाचारण करून मार्ग मोकळा करण्यात आला, तेव्हा सर्वांचा जीव भांड्यात पडला.

# विविध मागण्यांसाठी ग्रामपंचायत कर्मचारी आज एकवटणार

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधूनही अद्याप ठोस निर्णय न झाल्यामुळे अखेर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला असून आज मंगळवार दि. १७ जानेवारी रोजी जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत दि. १४ जून २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र सहा महिन्यांचा कालावधी उलटूनही संबंधित प्रश्नांचे निराकरण झाले नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे आंदोलनाशिवाय पर्याय उरला नसल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.



कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी (झऋ) व राहणीमान भत्ता लागू करणे, सेवा निवृत्तीनंतर मिळणारे लाभ तात्काळ देणे, नियमांनुसार रजा लागू करण्याबाबत स्पष्ट आदेश काढणे, तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा सुविधा देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच दि. २ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकाची अंमलबजावणी करणे, कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर अदा करणे, आकृतिबंधात ज्येष्ठतेनुसार नावे समाविष्ट करणे, सेवा निवृत्ती वयोमर्यादा निश्चित करणे तसेच सन २०२४ मधील सहा महिन्यांचे थकीत वेतन व फरकाची रक्कम तातडीने अदा करण्याची मागणीही करण्यात आली आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना उपदान अधिनियम १९७२ लागू करून त्यानुसार लाभ देण्याची मागणी संघटनेने केली आहेकाही ग्रामपंचायतींमध्ये कर्मचाऱ्यांना शनिवारी रजा दिली जात नसल्याची तक्रार असून याबाबत शासनाने स्पष्ट परिपत्रक काढावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे पारदर्शक पद्धतीने जाहीर करून ज्येष्ठता यादी व आरक्षणानुसार तात्काळ भरण्यात यावीत, अशीही मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे.याचबरोबर प्रा.प. कर्मचाऱ्यांचे वेतन थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

# रखडलेल्या एकदरा पुलाच्या कामाला सुरुवात

**मुरुड : प्रतिनिधी**

वाढत्या रहदारीला भार सोसणाऱ्या आणि अत्यंत महत्त्वाचा असलेला मुरुड एकदरा पुलाचे काम गेले १४ महिने बंद अवस्थेत असलेल्या पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे.



मुरुडला जोडणाऱ्या एकदरा पुलाला ६२ वर्षापेक्षा जास्त वर्ष झाली असून हा पुल कमकुवत झाला होता.या पुलाची दुरुस्ती न झाल्याने या पुलावरचे सुरक्षित कठडे व बेरींग पुर्णतः खराब झाल्याने हा पुल धोकादायक बनला होता. या पुलावरून एकदरा,माझेरी, राजपुरी, खोरा, डोंगरी या गावातील सर्व ग्रामस्थ रोजच्या रोज मुरुड शहराकडे रोज ये–जा करित असतात.पर्यटन क्षेत्र असल्याने तसेच पर्यटक ही या पुलावरून ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी ये–जा करित असतात.

या संदर्भात ल्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध होत होत्या. यांची दखल राज्य सरकारने घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत या पुलाच्या दुरुस्ती करिता ४ करोड रुपये मंजुर करुन हे काम ठाणे येथील संरचना या कंपनीला देण्यात आले होते.या कामाला २० जानेवारी २०२४ पासुन सुरुवात झाली होती.परंतु झालेला कामाचा बील ठकीत झाल्याने हे काम २० ऑक्टोबर २०२४ पासुन हे बंद होते.आज पुन्हा ठेकेदारांनी पुलाच्या कामाला सुरुवात केल्याने ग्रामस्थांसह शहरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला.

यावेळी संरचना या कंपनीचे कामगार परमेश्वर उरांव, तिजेश्वर उरांव व बुधवार उरांव यांनी सांगितले की सध्या पुलाच्या जाईन्डचं काम सुरू आहे.सदरचा पूल अत्यंत महत्वाचा असून राजपुरी येथील जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी हा एकमेव पूल पार करावा लागतो. या पुलाच्या दुरुस्तीमुळे पर्यटक व स्थानिक नागरिक यांना दिलासा मिळाला आहे.

## वाहतुक नियम भंग; साडे तीन लाख दंड वसुल

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात दि. १५ फेब्रवारी रोजी २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहन चालकांची तपासणी करुन वाहतुकीचे नियम भंग करणा–या एकूण ३१० इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ३,४९,४००/–रुपये इतका दंड आकारला आहे.

## लोधिवलीत हरिनाम सप्ताह

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लोधिवली नगरी पुन्हा एकदा हरिनामाच्या अखंड निनादाने दुमदुमणार आहे. हनुमान व विठ्ठल–रखुमाई मंदिर परिसरात ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखंड हरिनाम उत्सव आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, तो श्रद्धा, संस्कार आणि सामुदायिक ऐक्याचा दिव्य उत्सव ठरणार आहे.

या भक्तिमय पर्वात दररोज पहाटे काकड आरतीने वातावरण प्रसन्न होईल. त्यानंतर हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, ओजस्वी प्रवचने, सुरेल भजने, जोशपूर्ण कीर्तन आणि हरिजागर यांची अखंड मालिकाच रंगणार आहे. संपूर्ण परिसर नामस्मरणाच्या तेजाने उजळून निघणार असून भाविकांना आत्मशुद्धी व अंतर्मुख होण्याची संधी लाभणार आहे.

या सोहळ्यासाठी मान्यवर कीर्तनकार ह.भ.प. सच्चिदानंद महाराज कांबेकर (कांबे), संदिप महाराज यादव (आसरेवाडी), प्रविण महाराज फराट (इंजिवली) तसेच प्रवचनकार ह.भ.प. बाळाराम महाराज कुरंगाळे (कांबे), धर्मा महाराज भोईर (लोधिवली) आणि दत्ता महाराज शिंदे (कोपरी), जागर भजन हनुमान प्रासादिक भजन मंडळ कालणवाडी,हनुमान प्रासादिक भजन मंडळ टेंभरी,हनुमान प्रासादिक भजन मंडळ कुंभिवली यांची प्रभावी उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या वाणीतील अध्यात्मिक ओज भाविकांच्या अंत:करणाला स्पर्श करून नामभक्तीचा संदेश अधिक दृढ करेल.

मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हरिनामाच्या अखंड गजरात नगरप्रदक्षिणा काढण्यात येणार असून टाळ–मृदुंगाच्या निनादात वारकरी परंपरेचा जिवंत अनुभव भाविकांना घेता येणार आहे.तसेच दि. २५ फेब्रुवारी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत ह.भ.प. दिलीप महाराज राणे यांचे सुश्राव्य हरिकीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

## नांदगाव विद्यालयात गणित संबोध परीक्षा

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा गणित व विज्ञान शिक्षक संघटनेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ अंतर्गत आयोजित करण्यात आलेली गणित संबोध परीक्षा श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथे इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी मधील शालेय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली.

मुलांमध्ये गणित या विषयाची भीती कमी व्हावी व गुणवत्ता वाढवण्यासाठी सदरची परीक्षा घेतली जाते.गणितीय संबोध आकलन होण्याकामी सदरची परीक्षा ही खूप महत्त्वाची मानली जाते.सदरील परीक्षेचा उपयोग स्पर्धा परीक्षेसाठी सुद्धा उपयुक्त ठरतो त्यामुळे शालेय जीवनात ही परीक्षा खूप उपयुक्त महत्त्वाची मानली जाते. नांदगाव हायस्कूल मधील शालेय विद्यार्थ्यांनी या परीक्षेला उत्स्फूर्त सहभाग घेतला असून इयत्ता पाचवी मधील ४४ तर इयत्ता आठवी मधील ६९ असे एकूण ११३ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते.परीक्षा शुल्क असताना सुद्धा या विद्यालयातील विद्यार्थी परीक्षेत बसले होते.


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.३२/३७/२०२६ दिनांक : १६/०२/२०२६

**शहर अभियंता विभाग**
**जाहीर फेर ई–निविदा सूचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी–१ शतमान पद्धतीनुसार जाहिर फेर ई–निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/271/ 2025-26 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – अ, प्रभाग क्र.०४ मधील सेक्टर – १४, भुखंड क्र. १३ बी येथे प्राण्यांच्या अंत्यविधीकरीता स्मशानभूमी विकसीत करणे. (2nd Call) | रु.४,०६,९५,१६९/– |

या कामाच्या ई–निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. १७/०२/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
अतिरिक्त आयुक्त –।
पनवेल महानगरपालिका



**कुळगांव बदलापूर नगर परिषद**

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व),
कुळगांव, पिन–४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :– coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाईट :– http://kbmc.gov.in

जा.क्र. कुबनप/जाहिरात/४०१/२०२५–२६ दिनांक :– १६/०२/२०२६

**शुद्धिपत्रक**
**फेर ई–निविदा सूचना ०३ क्र. ०१/२०२५–२६**

कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीत नगरपरिषदेच्या मालकीच्या क्षेत्रात ०३ वर्षाकरीता जाहिरात फलक उभारणे व जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी हक्क देणे या कामी ठेकेदार / एजन्सी यांची नेमणुक करणे. या कामाची जाहीर फेर ई – निविदा सूचना ०३ क्र ०१/२०२५–२६ जा.क्र. कुबनप/ जाहिरात विभाग/३९०/२०२५–२६ दि.१३/०२/२०२६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

परंतु, सदर निविदेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१) सदर ई निविदा सूचना नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डावर व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०९/०२/२०२६ सकाळी ११:०० ते दि. १८/०२/२०२६ दुपारी २:०० पर्यंत राहील. दि. २०/०२/२०२६ रोजी सायंकाळी ४:०० वाजता अथवा अन्य सोईच्या दिवशी सदर ई – निविदा उघडण्यात येईल. याऐवजी सदर ई–निविदा सूचना नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डावर व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १६/०२/२०२६ सकाळी ११:०० ते दि.२६/०२/२०२६ दुपारी २:०० पर्यंत राहील. दि.०२/०३/२०२६ रोजी सायंकाळी ४:०० वाजता अथवा अन्य सोईच्या दिवशी सदर ई – निविदा उघडण्यात येईल. असे वाचण्यात यावे.

**सही/–**
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी
कुळगाव बदलापूर नगरपरिषद
कुळगाव



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे लोणिवली, ता. – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे लोणिवली, ता. पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १२९/२/ब | २ | ०–३१–९० | ०–०१–२० | ०–३३–१० | ५.७५ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/०२/२०२६

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे–मानघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली मिळकत, सदरहू मिळकतीचे गांव नमुना नं.७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्री. धरमशी हिरजी चौहान यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनींचे वर्णन**
**मौजे–मानघर, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| गट/हिस्सा नं. | भूधारणा पध्दती | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८/२ | भोगवटादार वर्ग–१<br>पोट खराबा<br>एकूण | ०–१८–९०<br>०–०४–३०<br>०–२३–२० | ३=७२ |

सदरहू मिळकतीत वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्तखत, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वीचा सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क, कूळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंन्डन्स नोटीस, मा. दिवाणी न्यायालयाचे जैसे थे हुकूम अथवा मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर दिवाणी न्यायालयाने दाव्यात अंतिम न्याय–निर्णय अथवा हुकूमनामा पारित केलेला असल्यास, कोणत्याही महसूली न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यास अथवा महसूली न्यायालयाचे मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर अंतिम न्याय निर्णय पारित केलेले असल्यास अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आंत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचेकडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास, सदरहू मिळकती निर्वेध, निर्विवाद व बोजाविरहित आहेत आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहेत व आमच्या अशिलांचे लाभांतील प्रस्तावित खरेदीखतास कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहित धरुन, आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी–विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारांत घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : – पनवेल
दिनांकः– १७/०२/२०२६.

**सही/–**
**श्री. जगदीश उरणकर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट ऑफिस :– १०१, आदीत्यप्रज्ञा को. ऑप, हौ. सो., गोखले हॉल शेजारी, पनवेल–४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड.**



**PUBLIC NOTICE**

PUBLIC NOTICE is hereby given to the Public at large that our clients intend to Purchase the Sub divided Plot of **JAWAHAR CO-OPERATIVE INDUSTRIAL ESTATE LIMITED** described herein below from **M/S. SAI PLASTIC INDUSTRIES PVT. LTD.**

**DESCRIPTION OF PLOT**

| NODE, TAL. & DIST. | PLOT NO. | ADM SQ. MTRS. |
|---|---|---|
| Kamothe, Tal. Panvel, Dist. Raigad | 93 | 613 SQ.MTRS. |

Any person having any objection in respect of the acquiring for Purchase of the said Plot may file, record his/her/their objections in writing within Twenty One (21) days of Publication of this Notice with the undersigned. If no claims in writing in respect of transfer of said Plot is received by the undersigned within Twenty One (21) days as stated hereinabove, then the same shall not be entertained and it shall be presumed that the said persons are entitle to transfer, assign the said Plot in favour of our client.

Sd-
**DHANANDA PRADEEP MOKAL**
(Advocate High Court)

Office address at Shop No. 14, Shiv Chamber, Plot No. 21, Sec 11, C.B.D. Belapur, Navi Mumbai, Tal. & Dist. Thane. Mob. No. 9619505958



अर्जदारातर्फे वकील ॲड. उज्वला तेटगुरे

**मे. दिवाणी न्यायाधिश क स्तर पनवेल यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज क्र. २२५ /२०२६
नि. ७/ड
ने.ता. २०/०३/२०२६

१. श्रीमती लता मारूती म्हस्के
२ सौ. रश्मी योगेंद्र पिंगळे
३. श्री. आंनद मारुती म्हस्के ........................ **अर्जदार**

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी, **कै. मारुती भाऊ म्हस्के** हे दिनांक २८/०६/२०२५ रोजी मित्र हॉस्पिटल – सेक्टर ५ खारघर ता. पनवेल, जि. रायगड येथे निधन झाले आहे.

**कै. मारुती भाऊ म्हस्के** यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

१. उपविभाग १/८ सदनिका क्र. ५०४, पाचवा मजला – बिल्डींग आर.२ सोसायटी मोराज आर.१ व आर २ टाईप को. ऑ. हौ सोसायटी लि. रिव्हर साईट पार्क प्लॉट नं ४४८–तक्का–पनवेल जि.–रायगड. क्षेत्र ६०२ चौ. फुट कारपेट.

२. आशापुरी कॉम्प्लेक्स इमारतीतील १/२ए विंग मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ६ ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ सुमारे ५४० चौ. फुट आहे.

३. सदनिका क्र. ६०५ सहावा मजला चंद्र दर्शन स्थळ, फ्लॅट नं. ३५ सेक्टर नं. ५ करंजाडे ता. पनवेल, जि. रायगड क्षेत्र. ३११.०५८ चौ. फुट कारपेट सी. बी. सहीत +४५ चौ. फुट एफ.बी + ४६ चौ. फुट टेरेस

४. गाव मौजे–मंचर ता. आंबेगाव – जि पुणे येथील मिळकत स.नं – हि.नं. १३०/१/१ एकुण क्षेत्र ०० हे आकार ०२ रू ५० पैसे – ब. स.नं.हि.नं ७७/२९ एकुण क्षेत्र ०० हे २६आर. आकार ०२रू ३६पैसे – क.स.नं हि. नं. १७७/३० यांसी – एकुण क्षेत्र ०० हे ७४ आर. आकार ०५ रू १२ पैसे यापैकी क्षेत्र ०० हे १४ आर यांसी अ. ब–क मिळुन एकुण क्षेत्र हे ००.८० आर सदर मिळकत यावरील स्वर्ण कलश या ओनरशीप स्किम मधील निवास सदनिका नं. २०३ – विंग नं. ए मधील दुसरा मजला २. बी.एच–के. के क्षेत्र ६०९.५६ चौरस फुट ५६.६३ चौरस मीटर कारपेट – कारपेटसह ६०९.०० चौ. फुट

मयत **कै. मारुती भाऊ म्हस्के** यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत **कै. मारुती भाऊ म्हस्के** यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक ११/०२/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क. लिपिक** दिवाणी न्यायालय (व स्तर) पनवेल, जिल्हा रायगड

कोर्टाचा शिक्का

**सही/–** **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय (व स्तर) पनवेल, जिल्हा रायगड

# पनवेलमध्ये स्पर्श अभियान

## विविध स्पर्धांसह मॅरेथॉनचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान २०२६ यशस्वीरीत्या राबविण्यात आले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हे अभियान आयोजित करण्यात आले. या अभियानांतर्गत मॅरेथॉन व विविध खेळांचे आयोजन करण्यात आले.

या अभियानाचा एक भाग म्हणून ३ फेब्रुवारी रोजी सकाळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र. ५ ते सेंट्रल पार्क या मार्गावर जनजागृती मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया हा संदेश देत



कुष्ठरोगाबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी, रुग्णांना समाजात सन्मानाने वागणूक मिळावी यासाठी पालिकेच्या वतीने स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच 'कुष्ठमुक्त महाराष्ट्र (कुसुम)' विशेष सर्वेक्षण मोहिमेद्वारे शहरात सक्रिय रुग्ण शोध मोहिमही हाती घेण्यात आली आहे.

उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांच्या सूचनेनुसार व मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांच्या नेतृत्वाखाली या अभियानांतर्गत बॅडमिंटन, खो-खो, बुद्धीबळ, कबड्डी, क्रिकेट, संगीत खुर्ची, कॅरम, रांगोळी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कुष्ठरोग जनजागृती व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव असा दुहेरी समन्वय या अभियानाच्या माध्यमातून साकारण्यात आला. याचबरोबर विविध शाळांमध्येही निबंध स्पर्धा व रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा व मॅरेथॉन यशस्वी करण्यासाठी शहर क्षयरोग व कुष्ठरोग अधिकारी डॉ.उषा राठोड यांच्या समवेत डॉ. गणेश नायर, डॉ.भक्तराज भोईटे, डॉ.मनिषा चांडक, डॉ.सुरेश पंडित, डॉ.आकाश ठसाळ यांचे सहकार्य लाभले.

# सहा हजारहून अधिक नागरिकांनी आरोग्य शिबिरांचा घेतला लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५०व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी होणाऱ्या कार्यक्रमापूर्वी १० फेब्रुवारीपासून नमुंमपा आरोग्य विभागाच्या वतीने विशेष आरोग्य शिबिरांचे महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी आयोजन करण्यात येत आहे. २५ फेब्रुवारीपर्यंत १२४ ठिकाणी आरोग्य शिबीरांचे नियोजन करण्यात आले आहे.

आतापर्यंत आयोजित आरोग्य शिबिरांमधील तपासणी व सुविधांचा लाभ नागरिकांनी मोठ्या संख्येने घेतला असून १० फेब्रुवारी रोजी चार ठिकाणी ४७५, ११ फेब्रुवारी रोजी १० ठिकाणी ९६४ आणि १२ फेब्रुवारी रोजी १४ ठिकाणी ३३१८ इतक्या नागरिकांनी वैद्यकिय सुविधांचा लाभ घेतला आहे.

१३ फेब्रुवारी रोजी १३ विविध ठिकाणी आयोजित शिबीरांना १५०३ नागरिकांनी भेट देवुन आरोग्य तपासणी करुन घेतली. यामध्ये माता बाल रुग्णालय बेलापूर तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे




नेरूळ १, कुकशेत, तुर्भे, पावणे, महापे, कोपरखैरणे सेक्टर १४, नोसिलनाका, राबाडा, कातकरीपाडा, कोपरखैरणे सेक्टर १६, ऐरोली व दिघा यांच्या कार्यक्षेत्रामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरांमधील आरोग्य तपासणी अंतर्गत उच्च रक्तदाब व मधुमेहाच्या निदानासाठीची तपासणी, तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या तोंडाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी, माता व बालकांचे आरोग्य आणि लसीकरण, क्षयरोग होण्याची अतिजोखीम असलेल्या महिलांची क्षयरोग निदान तपासणी, सिकलसेल रोग (SCD) तपासणी करण्यात येत आहे. यासाठी स्त्रीरोगतज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, कान नाक व घसा रोग तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, दंत शल्यचिकित्सक अशा अनुभवी तज्ज्ञांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त ही आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येत असून मागील चार दिवसातील ३७ ठिकाणच्या शिबीरांचा लाभ ६२६० इतक्या मोठया संख्येने नागरिकांनी घेतला असल्याची माहिती देत वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे यांनी या पुढील काळात आपल्या घराजवळ आयोजित केल्या जाणाऱ्या आरोग्य शिबिरांना भेट देऊन आपली वैद्यकिय तपासणी करून घ्यावी असे आवाहन केले आहे.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये विविध उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भव्य हिंद-दी-चादर या ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जनजागृतीसाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे तसेच शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली १३ फेब्रुवारी २०२६ पासून महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याचबरोबर आता महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये ही विविध स्पर्धांचे व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये विद्यार्थ्यांची प्रभात फेरी, प्रार्थना सत्र, तसेच निबंध स्पर्धा, भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गायन स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच गुरु तेग बहादुर यांच्या कार्याचा व बलिदानाचा इतिहास विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात येणार आहे.

हिंद की चादर कार्यक्रमाच्या निमित्ताने ऐतिहासिक वारसा व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश सर्वत्र पोहोचविण्याचा प्रयत्न महानगरपालिका करत आहे. या उपक्रमात महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. उपक्रम नियोजित वेळापत्रकानुसार सुरू असून, हिंद-दी-चादर कार्यक्रमाबाबत जनजागृती व्यापक स्वरूपात करण्यात येत आहे.

# सीकेटी महाविद्यालयात 'न्यूट्रीफेस्ट' साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने 'न्यूट्रीफेस्ट' स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये संतुलित आहार, पौष्टिक अन्नपदार्थांची निर्मिती आणि आरोग्यदायी जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. एस. नन्हे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विज्ञान शाखा प्रमुख प्रा. डॉ. जे. एस. ठाकूर यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. स्पर्धेच्या



परीक्षक म्हणून मुलुंड येथील व्ही.जी.वझे कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स (स्वायत्त) येथील वनस्पतीशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक व आहारतज्ज्ञ डॉ. रजनी शिरसाठ उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करताना संतुलित आहाराचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. सध्याच्या युवा पिढीने सात्विक आहारावर भर द्यावा आणि आरोग्यपूर्ण आहार व जीवनशैलीचा अंगीकार करावा, असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले.

या स्पर्धेत एकूण ४७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत विविध नाविन्यपूर्ण व पौष्टिक पाककृती सादर केल्या. महाविद्यालयातील अनेक ज्येष्ठ प्राध्यापकांनी या न्यूट्रीफेस्टला भेट दिली आणि विविध खाद्यपदार्थांचा आनंद घेत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून संतुलित आहाराची मांडणी करत सर्जनशीलता आणि आरोग्यजाणिवेचा उत्तम संगम घडवून आणला.

सहभागी विद्यार्थ्यांच्या सकारात्मक प्रतिसादासह हा उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. 'न्यूट्रीफेस्ट'मुळे विद्यार्थ्यांना आरोग्यदायी आहाराविषयीची जाणीव अधिक दृढ झाली असून हा कार्यक्रम प्रेरणादायी आणि माहितीपूर्ण ठरला. नाविन्यपूर्ण कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# आवरे येथील ब्राह्मणदेव शिवमंदिरात दर्शनासाठी गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील दक्षिण काशी संबोधिल्या जाणाऱ्या आवरे ब्राह्मणदेव शिवमंदिरात महाशिवरात्री निमित्ताने भाविकांनी सकाळ पासूनच महादेवाच्या दर्शनासाठी शिवभक्तांनी मोठ्ठी गर्दी केली होती.

रविवारच्या सुट्टीमुळे दरवर्षी पेक्षा अधिक शिवभक्तांनी या ब्राम्हणदेव शिवमंदिरात भलीमोठ्ठी रांग लावली होती. उन्हाचा तडका असल्याने येथील देवस्थान मंडळाच्या वतीने शिवभक्तांचे उन्हापासून रक्षण व्हावे यासाठी भव्य अशा छतमंडपाची उभारणी करण्यात आली होती.

उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील तीन नाद्यांचा संगम



या ब्राम्हणदेव शिवमंदिराच्या ठिकाणी झालेला असून, हे अनेक वर्षांपूर्वीचे पुरातन ब्राम्हणदेव शिवमंदिर आहे. मंदिराच्या डाव्या बाजूला रांजण वृक्ष तर उजव्या बाजूला मोठ्ठा दगड आणि चाफ्याच्या फुलांचे वृक्ष आहे. या मोठ्ठ्या दगडात या ब्राम्हणदेवाचे खरे स्थान असल्याचे जाणकार शिवभक्त सांगत आहेत. पूर्वी या ठिकाणी देवाचे मंदिर नव्हते.

या ठिकाणी देवाचे स्थान असलेल्या दगडावर कौलांचे किंवा पेंढ्याचे छप्पर लावल्यास ते दुसऱ्या रात्रीत उडविले जात असे देवाला छप्पर लागत नव्हते. असाही येथील जुन्या जाणकारांची अनुभूती होती.

या उरण तालुक्यातील दक्षिण काशी संबोधिल्या जाणाऱ्या या ब्राम्हणदेव शिव मंदिरात उरण, पनवेल व पेण तालुक्यातील विविध गाव - खेड्यातील शिवभक्त दूरवर शहराच्या ठिकाणी नोकरी, धंद्यानिमित्त बाहेर राहणारे शिवभक्त महाशिवरात्री निमित्त मोठ्या भक्तीभावाने महादेवाच्या दर्शनासाठी नित्यनेमाने ३ किमी अंतर पायी चालत येऊन नतमस्तक होत आहेत. पावसाळ्यातील श्रावण महिन्यातील दर सोमवारीही या मंदिरात देव दर्शनासाठी अनेक शिवभक्त येत असतात.

उरण तालुक्यातील जागतिक बंदर म्हणून ख्याती असलेल्या जेएनपीए येथील जुने शेवा गाव येथेही पुरातन असलेले शिवमंदिर, कळंबूसरे, चिरनेर, पिरकोन येथील शिवमंदिर आणि तेथे ठिकठिकाणी असलेल्या शंभू महादेवाच्या विरगळ आणि जागतिक बेट असलेल्या घारापुरी येथे आजच्या दिवशी महाशिवरात्री निमित्त शिवभक्त आणि रात्री उशिरापर्यंत पर्यटकांच्या गर्दीचा उचांक पाहवयास मिळत आहे.

# कळंबोलीत घुमला हर हर महादेवचा गजर

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहतीमध्ये महाशिवरात्र उत्सव मोठ्या उत्साह पूर्णाने भक्ती भावाने साजरी करण्यात आली. वसाहतील शिव श्रद्धा सेवा संस्थेच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन मोठ्या दिमाखदार सोहळ्यात करण्यात येते. भजन, कीर्तन, पूजा, आर्चा विविध सामाजिक उपक्रमाने महाशिवरात्री उत्सव सोहळा चे आयोजन संस्थेच्या वतीने केले जाते. हजारो शिवभक्तांनी येथील मंदिरात दर्शन घेऊन महाशिवरात्री उत्सवात सहभाग घेतला.

कळंबोलीत महाशिवरात्री उत्सवानिमित्त शिव श्रद्धा सेवा संस्थेच्या वतीने विविध भक्तीमय तसेच सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात येतात. या



मंदिरात पहाटेपासून दर्शनासाठी शिवभक्तांची रांग लागलेली होती. हजारो शिवभक्तांनी या मंदिरातून शिवाची मनोभावे पूजाअर्चा करून भक्तीभावात लिन झाले. सकाळपासून मंदिराच्या जवळच भजन कीर्तन सामाजिक प्रबोधनचे आयोजन मंडळाकडून करण्यात आले होते. या मंदिरात विविध सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक राजकीय व्यक्तींनीसुद्धा सहभाग घेतला. मंदिर सेवा संस्थेच्या वतीने महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला शिवप्रतिमेची गाजत वारकरी संप्रदायाच्या टाळ मृदुंगाच्या गजरात कळंबोली वसाहती मधून मिरवणूक काढण्यात आली.

दानशूर दात्यांकडून मिळालेल्या देणगीतून मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे आयोजन शिव श्रद्धासेवा मंदिर संस्थेकडून करण्यात येत असल्याचे मंदिर सेवा संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र उतेकर यांनी सांगितले आहे. या महाप्रसादाचा लाभ हजारो शिवभक्त हे दरवर्षी घेत असतात.

# उरण येथे स्वामी समर्थांच्या पादुकांचा आगमन सोहळा

**उरण : वार्ताहर**

उरण येथील श्री स्वामी समर्थ मठ आनंद नगर, उरण येथे रविवारी (दि.१५) सकाळी ८.३० ते १० वाजेपर्यंत श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचे आगमन प्राणप्रतिष्ठा सोहळा



राज शेखर म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले, अशी माहिती श्री स्वामी समाज मंदिर अध्यक्ष शेखर द्वारकानाथ म्हात्रे यांनी दिली.

कार्यक्रमात सकाळी अक्कलकोट येथून आणलेल्या श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचे अभिषेक करण्यात आले. शंकराच्या पिंडीवर अभिषेक, श्री स्वामींचा अभिषेक करण्यांत आला. पादुकांचे प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली. सकाळी १०.३० वाजता महाआरती करण्यात आली. सर्व भक्तांनी पादुकांचे दर्शन घेतले. सर्व भक्तांनी दर्शनाचा व तीर्थ प्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी ६.३० वाजता महा आरती करण्यांत आली. उरण परिसरातील स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दररोज सकाळी ८ वाजता आरती, ८.३० वाजता हनुमान चालीसा, सायंकाळी ६.३० वाजता आरती करण्यांत येते. दर गुरुवारी सकाळी ८ वाजता आरती व अभिषेक, ८.३० वाजता हनुमान चालीसा १०.३० वाजता आरती व ६.३० वाजता आरती करण्यांत येते श्री स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित असतात.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.१६) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी प्रमुख पाहुण्यांचे व इतर सर्व मान्यवरांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले तसेच या वेळी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे मुख्य अतिथी म्हणून दीपक शिंदे सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर, यांनी उपस्थित राहून त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके दिली तसेच मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन श्री वाय टी देशमुख यांनी उपस्थित राहुन विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमासाठी व त्यांच्या हस्ते




विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र प्रदान केली तसेच शुभेच्छा दिल्या.

या वेळी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर, प्रभाकर जोशी, संतोष खांदेकर, मुख्याध्यापक, रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय आदी उपस्थित राहून विजेत्यांना प्रमाणपत्र व पारितोषिके प्रदान करण्यात आली व सर्वांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी महाविद्यालयात प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी व पालक यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातील सर्व प्राध्यापक, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोलाचे सहकार्य केले. या वेळी विविध गुणदर्शन मोठ्या उत्साहात करण्यात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नीलम मोरे व प्रा. तनुजा सुमन यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन परीक्षा विभाग प्रमुख प्रा. डॉ. नीलम लोहकरे यांनी केले.

# शिवस्वरूप कराडचा पोलिसांकडून सत्कार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ येथील स्व. मीनाताई ठाकरे हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी आलेल्या उलवे येथील महिलेची हरवलेली सोन्याची साखळी शिरवणे हायस्कूल मधील लहानग्या विद्यार्थांनी नेरूळ पोलिसांच्या सहकाऱ्याने परत केल्याने सदर विद्यार्थांचे नेरूळ पोलीस आणि शिरवणे विद्यालयाने कौतुक करून जाहीर सत्कार केला.


शिरवणे हायस्कूल, नेरूळ शाळेतील प्राथमिक विभागात शिकत असलेला इयत्ता ४ थी च्या वर्गातील विद्यार्थी शिवस्वरूप भागिनाथ कराड हा १३ फेब्रुवारी शुक्रवार रोजी स्व.मीनाताई ठाकरे हॉस्पीटल, नेरूळ येथे उपचारासाठी गेला होता. या ठिकाणी त्याला ४ तोळ्यांची सोन्याची साखळी सापडली, सोन्याची साखळी सापडल्यानंतर शिवस्वरूप कराड यांनी स्वतःहून पालकांना ही माहिती सांगत सापडलेली सोन्याची साखळी नेरूळ पोलीस स्टेशनला जमा करून देऊ असे निश्चित केले. त्यांनी ती सोन्याची साखळी शनिवारी नेरूळ पोलीस स्टेशन येथे जाऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार मुंजा मुंडे यांच्या समक्ष तक्रारदार बयवबाई अरुण ठाकूर यांना पोलीस ठाण्यात सुपूर्त केली.



नेरूळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी शिवस्वरूप कराड या विद्यार्थ्याला पाच हजार रुपये रोख रकमेचे पारितोषिक देऊन त्याचा पोलीस ठाण्यात सत्कार केला. तसेच शिरवणे हायस्कूल चे अध्यक्ष व नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, विद्यालयाच्या प्राचार्या, भाग्यश्री चौधरी, मुख्याध्यापिका मनिषा पाटील यांनीही या विद्यार्थ्याचे कौतुक करून अभिनंदन केले.

# रायगडात महाशिवरात्रीनिमित्त शिवशंकराचा जयघोष

## माणगाव येथील संगमेश्वर मंदिरात दर्शनासाठी भक्तगणांची रांग



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या संगमेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही रविवार १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

माणगाव येथील संगमेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी करण्यात आली. पहाटे ४ ते ६ वा.अभिषेक झाल्यावर भक्तगण दिवसभर मंदिरात दर्शनासाठी येत होते. हजारोंच्या संख्येने भक्तगणांची उपस्थिती होती. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण जाणवत होते. मंदिराच्या गाभाऱ्यात प्रसाद खरे, सचिन गोरेगावकर यांनी उत्तम अशी सजावट केली होती. आलेल्या सर्व भक्तगण भाविकांचे मंदिर ठिकाणी मंदिर ट्रस्टचे प्रभारी अध्यक्ष संजयआण्णा साबळे, ट्रस्टी महादेव कनोजे, उमेश शेट, मेथा सर, नगरसेवक दिनेश रातवडकर, दिलीप पारखे तसेच सामाजिक कार्यकर्ते सुनील धुमाळ, सचिन गोरेगावकर, पुजारी हरेश जंगम, शेखर जाधव व सहकाऱ्यांनी स्वागत केले.

हा महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी, आनिरुद्ध उपासना केंद्र माणगाव, संगमेश्वर नगर ग्रामस्थ मंडळ यांचेही विशेष सहकार्य लाभले.

## चौलच्या पुरातन रामेश्वर मंदिरात भाविकांची अलोट गर्दी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्राचीन व ऐतिहासिक श्री रामेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त भक्ताची अलोट गर्दी दर्शनासाठी अलोट गर्दी पहावयास मिळाली.

दक्षिण काशी अशी ओळख असलेले चौल येथील श्री रामेश्वर मंदिर व परिसर महाशिवरात्री निमित्ताने विदयुत रोषणाई, रांगोळी, तसेच फुलमाळानी सजविण्यात आले होते. महाशिवरात्री निमित्ताने मंदिरात पुजाअर्चा व दर्शनासाठी मोठया भक्तीमय वातावरणात भक्तमंडळीने गर्दी केली होती. या वेळी भक्ताची दर्शनासाठी मोठी लाईन लागलेली होती. अनेकांनी मोठ्या भाविकतेने श्री रामेश्वर दर्शनाचा लाभ घेतला.

महाशिवरात्री निमित्ताने चौल श्री रामेश्वर मंदिर येथे जत्रेचे स्वरूप प्राप्त होते. या निमित्त फुल विक्रेते, खेळणी, चणवाले, फेरीवाले तसेच स्विटमिठाई वाल्यांनी दुकाने थाटली होती. पंचक्रोशीतील अनेक भक्तमंडळीने चौल श्री रामेश्वर मंदिर येथे महाशिवरात्रीचे निमित्ताने मोठया भाविकतेने व श्रध्देने दर्शनाचा लाभ घेतला.



## रोह्यातील मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील शिव मंदिरात महाशिवरात्रीचा उत्सव मोठा उत्साहात साजरा करण्यात आला. विविध अध्यात्मिक, धार्मिक कार्यक्रम मंदिरात घेण्यात आले. भजन, कीर्तन आदीही ठेवण्यात आले होते.

रोहा शहरातील सगळ्यात जुन्या असलेल्या ओंकारेश्वर मंदिरात सकाळपासूनच दर्शनासाठी शिवभक्तांची रांग लागली होती. रोहा शहरा नजीक असलेल्या भुवनेश्वर येथील प्राचीन काळातील असलेल्या शिव मंदिरात मोठ्या उत्साहात महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात आला असून या ठिकाणी अभिषेक सह पूजा, अर्चा करण्यात आल्या. या मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावून दर्शन घेतले.



रोहा तालुक्यातील मेढा येथे ही वाकेश्र्वर मंदिर येथे ही महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मेढा येथे यात्रा भरली होती.या या यात्रे निमित्ताने पंचक्रोशीतील भाविक मोठ्या प्रमाणात आले होते.

सायंकाळी मंदिरात महाआरती घेण्यात आली. परिसरात रस्त्याच्या दुतर्फा रांगोळी सजावट करण्यात आली होती. सर्वत्र उत्साहाचे व भक्तीचे वातावरण होते.

## मुरूडमधील शिवमंदिरांत पूजा-अर्चा

**मुरूड : प्रतिनिधी**

महाशिवरात्र हा वर्षातील सर्वांत महत्त्वाचा दिवस समजला जातो आणि त्याच निमित्ताने मुरूड शहरातील सुप्रसिद्ध कल्याणी हॉस्पीटलमधील ४६ वर्षं पुर्वीच्या शिवमंदिरात शिवभक्त भाविकांनी बम बम भोलेनाथचा जयघोष करत दर्शनासाठी गर्दी केली होती.



महाशिवरात्री उत्सवानिमित्त मंदिराला सुंदर फुलांनी व आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. सकाळच्या दरम्यान मंदिरात डॉक्टर मयुर कल्याणी व मुरली छाब्रिया रेश्मा छाब्रिया यांच्या हस्ते पुरोहित समिर उपाध्ये यांच्या कडुन भगवान शिवलिंगावर सहस्त्र बेल वाहण्यात आल्यानंतर भगवान शिवशंकरा ची विशेष पुजा करण्यात आली गाईचे दूध, तुप गोमुत्र दही लावुन शिवलिंगवर अभिषेक करण्यात आले.

शिवलिंगावर धोत्रा फुल ,सफेद फुले,बेल वाहुन मनोभावे पूजा करण्यात आली. तद्नंतर पाच पुरोहित कडुन होम हवन व लघुरुद्र यज्ञ करण्यात आले. त्यानंतर डॉक्टर राज कल्याणी, डॉ. भाविका कल्याणी, मयूर कल्याणी, लक्ष्मी कल्याणी, भुमीत कल्याणी यांनी ही भगवान शिवलिंगावर बेल दुध वाहुन मनोभावे पूजा करण्यात आली. त्यानंतर आरती करण्यात आल्यानंतर दर्शनासाठी मंदिर भाविकांना खुले करण्यात आले.

या वेळी येणाऱ्या जाणाऱ्या शिवभक्तांना लक्ष्मी कल्याणी यांच्या हस्ते रताळी व दुधाचा प्रसाद वाटप करण्यात आले. या वेळी डॉक्टर राज कल्याणी, डॉक्टर भाविका कल्याणी, व लक्ष्मी कल्याणी, भुमीत कल्याणी महिला शिवभक्त उपस्थित होते.

शहरातील प्राचीन काळातील भोगेश्वर पाखाडी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाज व देवस्थान ट्रस्ट मधील शिव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त सकाळच्या दरम्यान शिवभक्त राजु पोतनीस व त्यांच्या पत्नी सुक्ष्मा पोतनीस यांच्या कडुन भगवान शिवलिंगवर बेल, दुध, तुप फुले वाहुन शिव शंकराची विशेष पूजा करण्यात आली. तद्नंतर दर्शनासाठी मंदिर भाविकांना खुले करण्यात आले. या वेळी शिवभक्त भाविकांनी गर्दी केली होती.

## श्रीवर्धनच्या जीवनेश्वर मंदिरात महोत्सव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील सुप्रसिद्ध श्री जिवनेश्वर मंदिर हे शैव परंपरेचा गौरवशाली वारसा जपणारे एक प्राचीन व ऐतिहासिक देवस्थान म्हणून भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र मानले जाते. पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या लोकश्रद्धा, पौराणिक कथा आणि अध्यात्मिक अनुभूती यांमुळे या मंदिराला एक वेगळे दैवी महत्त्व प्राप्त झाले आहे.

या प्राचीन परंपरेला उजाळा देणारा ४५ वा महाशिवरात्री महोत्सव शके १९४७ अंतर्गत २५ जानेवारी ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. महोत्सवाची सुरुवात रथसप्तमी दिनी धर्मध्वजवंदन, विधीपूर्वक उत्सव संकल्प आणि जनजागरण दिंडीद्वारे सांप्रदायिक उत्सव भिक्षा प्रारंभाने झाली.



महोत्सव काळात दि. १० ते १६ फेब्रुवारी दरम्यान दररोज सकाळी श्री ज्ञानेश्वरी व शिवलीलामृत पारायण झाले असून महिला व पुरुष भाविकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला. याच कालावधीत नामवंत नारदीय कीर्तनकार ह.भ.प. श्री. प्रशांत दीपक डोंगरे (पनवेल) यांच्या सुश्राव्य नामसंकीर्तनाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसाने ओथंबून गेला. विविध वेळांना झालेली काल्याचे कीर्तन, भाविकांसाठी अत्यंत भावस्पर्शी व आध्यात्मिक अनुभूती देणारी ठरली.

सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे पारायण सांगता (मंगल), गोपाळकाला, गोपूजन, भजन-दिंडी, दहीहंडी असे पारंपरिक कार्यक्रम भक्तिभावात पार पडले. याच दिवशी आज महाप्रसाद-भोजन आयोजित करण्यात आले असून, हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. भाविकांच्या सोयीसाठी देवस्थान प्रशासनातर्फे विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

जिवनेश्वर देवस्थान ट्रस्ट, पंच समिती व श्री समर्थ भाविक मंडळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेला हा महोत्सव केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित न राहता सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक परंपरा आणि भक्तीभाव अधिक दृढ करणारा ठरला. काळ बदलला तरीही श्रद्धा, इतिहास आणि अध्यात्म यांचा त्रिवेणी संगम असलेले श्री जिवनेश्वर मंदिर आजही भाविकांना एक दिव्य, अविस्मरणीय अनुभव देत असल्याचे या महोत्सवातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## कर्जत तालुक्यातील मंदिरांमध्ये भक्तांकडून हर हर महादेवचा गजर

**कर्जत : प्रतिनिधी**

महाशिवरात्री असल्याने कर्जत तालुक्यातील महादेवाच्या प्रत्येक मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. आज रविवार असल्यामुळे तालुक्यातील प्रत्येक मंदिराच्या बाहेर दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा दिसत होत्या. बहुतांश मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते सायंकाळी कपालेश्वराची पालखी मिरवणूक काढण्यात आली. रात्री नऊ वाजे पर्यंत कर्जतकरांनी पालखीतील कपालेश्वराचे मनोभावे दर्शन घेतले.

कर्जत शहरातील श्री कपालेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. महाशिवरात्री निमित्त मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह. भ. प. श्रीराम पुरोहित यांची तीन दिवस प्रवेचने झाली. श्री कपालेश्वराची महापुजा अमोल देशमुख आणि कोमल देशमुख, निलेश सोनी आणि वनिता सोनी या उभयतांच्या आणि ज्योती किसवे यांच्या हस्ते करण्यात आली. लघुरुध्द अभिषेक त्यानंतर सामुहिक शिवलिलामृत पारायण झाले. पहाटेपासून श्री कपालेश्वरांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.



सायंकाळी श्री कपालेश्वराची पालखी मिरवणुक शिव तांडव या ढोल ताशा पथकाच्या गजरात काढण्यात आली. तसेच देऊळवाडी येथेही पालखी मिरवणूक काढण्यात आली. कपालेश्वर मंदिरात दीपकबुवा करोडे आणि सहकाऱ्यांचे भजन झाले. आरतीने मिरवणुकीची सांगता करण्यात आली. सर्वच ठिकाणी मोठ्या उत्साहात महाशिवरात्री साजरी करण्यात आली. त्यावेळी मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुद्रेश्वर मंदिरातही दर्शनासाठी भक्तांनी गर्दी केली होती. तेथे गुरुनाथ पालकर व मंगल पालकर या उभयतांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. रात्री महाप्रसाद देण्यात आला.

कर्जत तालुक्यातील पांडवकालीन वैजनाथ येथील मंदिरात शिवभक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. वैजनाथ येथील मंदिरात शिवभक्तांसाठी यात्रा तेथे भरली होती. दिवसभर कर्जत तालुक्याबरोबर अन्य तालुक्यातील भाविक यांची दर्शनासाठी वर्दळ सुरु होती. कोल्हारे येथे त्रिवेणी संगमावर असलेल्या पांडवकालीन शिवमंदिरामध्ये शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी सकाळी प्रचंड गर्दी झाली होती.

याशिवाय कर्जत तालुक्यातील सर्वच शिवमंदिरात मोठ्या उत्साहात महाशिवरात्री उत्साहात साजरी करण्यात आली. देऊळवाडी, कोल्हारे, लाखरन, कोषाणे, साळोख, तमनाथ, माथेरान, मानिवली, बिरदोले, शेलू, धामोते येथील धनेश्वरी, नेरळ मधील कुसुमेश्वर मंदिर, निर्माण नगरी येथील शिवमंदिर, मोहाचीवाडी, भडवळ, कळंब, पोही, खांडस, देवपाडा, वंजारपाडा, गुढवण, कशेळे, वारे, कोठींबे, आंबिवली, मांडवणे, लाखरन, चांदई, कडाव, बीड, देऊळवाडी आदी ठिकाणी असलेल्या शिव मंदिरात सर्वत्र भक्तांची गर्दी होती. माथेरान येथील पिसरनाथ महाराज तसेच कर्जत शहरातील धापया आणि कपालेश्वर येथील मंदिरात शिवरात्री निमित्य असंख्य धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरु होती.

## नागोठण्यात रंगणार अखंड नामयज्ञ सोहळा; २० ते २३ फेब्रुवारीदरम्यान पर्वणी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता प्रांगणात सालाबादप्रमाणे फाल्गुन शु. तृतीय शुक्रवार, २० फेब्रुवारी ते सोमवार, २३ फेब्रुवारी पर्यंत स्वा. सु. नि. गुरुवर्य गणपतबाबा अलिबागकर महाराज, स्वा. सु. नि. गुरुवर्य गोपाळ महाराज वाजे, स्वा. सु. नि. गुरुवर्य धोंडू महाराज कोल्हटकर, स्वा. सु. नि. गुरुवर्य तुकाराम महाराज पतारे यांच्या कृपाशीर्वादाने व पंढरपूर मठाधिपती स्वा. सु. नि. नारायणदादा वाजे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण होणार आहे. प्रसिद्ध कीर्तनकारांचे कीर्तन व प्रवचन होणार असून याचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा अशी विनंती संत सेवा मंडळ ज्ञानेश्वर मंदिर नागोठणे यांच्या वतीने करण्यात आली आहे.

संत सेवा मंडळ ज्ञानेश्वर मंदिर नागोठणेचे संस्थापक वै. हभप सिताराम बापूजी रावकर उर्फ आण्णा यांच्या प्रेरणेने शुक्रवार दि. २० ते सोमवार दि. २३ पर्यंत रोज सकाळी ४ ते ६ काकड आरती, सकाळी ८.३० ते १२.३० आणि दुपारी २ ते ४.३० वाजता ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण, सायंकाळी ४.३० ते ५.३० वाजेपर्यंत शुक्रवारी हभप दिनेश महाराज कडव (वादोली) यांचे प्रवचन, शनिवारी गुरुवर्य हभप विठोबा महाराज मांडलुसकर (वणी) यांचे प्रवचन, रविवारी हभप अनिल महाराज शिंदे (कडसुरे) यांचे प्रवचन सायंकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत हरिपाठ तसेच शुक्रवारी सायंकाळी ७ ते ९.३० वाजेपर्यंत हभप नित्यानंद महाराज मांडवकर (चणेरा) यांचे कीर्तन, शनिवारी सायंकाळी ७ ते ९.३० वाजेपर्यंत हभप महेंद्र महाराज भोईर (भिवंडी) यांचे कीर्तन व रविवारी सायंकाळी ७ ते ९.३० वाजेपर्यंत हभप डॉ. हरिदास महाराज पालवे (शास्त्री आळंदी) यांचे कीर्तन.

शुक्रवार ते रविवार दुपारी व रात्री महाप्रसाद कार्यक्रम तसेच सोमवारी दुपारी काल्याचे कीर्तना नंतर महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संत सेवा मंडळ ज्ञानेश्वर मंदिर नागोठणे यांच्या वतीने देण्यात आली आहे.

(छाया : जितू शिगवण)



**अलिबाग : तालुक्यातील नवेदर नवगाव येथे श्री बोरेश्वर महाराजांचा पालखी सोहळा.**

## टीइटी उत्तीर्ण नसलेल्या सेवाज्येष्ठ शिक्षकांना पदोन्नतीची संधी देण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या शिष्टमंडळाने शिक्षण संचालक शरद गोसावी यांची शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली भेट घेतली. जे सेवाज्येष्ठ शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत त्यांना पदोन्नतीची संधी देण्यात यावी, अशी विनंती या वेळी करण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयाच्या पार्श्वभूमीवर शिक्षक संवर्गातून पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, समूह साधन समन्वयक (केंद्रप्रमुख) व विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदावर पदोन्नती देताना शिक्षक प्रवेश पात्रता परीक्षा (टीइटी) उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. पदोन्नती प्रक्रिया राबवण्याबाबत विविध शिक्षक संघटना यांनी नाराजी व्यक्त करून टी इटी परीक्षेतून पदोन्नतीस पात्र शिक्षकांना परीक्षेतून सुट द्यावी अशी विनंती केलेली आहे.



सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संबंधी शासनामार्फत राष्ट्रीय शिक्षण परिषदेकडे तसेच केंद्र सरकारच्या शालेय शिक्षण विभागाकडे राज्य शासनाकडून कार्यालयामार्फत मार्गदर्शन मागवण्यात आलेले असून याबाबत सुस्पष्ट अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

जे शिक्षक प्रवेश पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, अशाच शिक्षकांना पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, समूह साधन समन्वयक(केंद्रप्रमुख) व विस्तार अधिकारी (शिक्षण) पदावर पदोन्नती द्यावी, असे निर्देश राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आले आहेत.

पदोन्नती दिलेल्या शिक्षकांना टीइटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षाची संधी मिळावी, दोन वर्षांमध्ये ज्यांनी पदोन्नती घेतलेली आहे असे शिक्षक टीइटी उत्तीर्ण झाले नाहीत तर त्यांना दिलेली पदोन्नती रद्द करावी तसेच त्यांना पदोन्नती नंतर देण्यात आलेले अधिकचे वेतन, इतर भत्ते त्यांच्याकडून वसूल करण्यात यावे.

या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्या समवेत चर्चा करण्यात आली. त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन गोसावी यांनी दिल्याचे राजेश सुर्वे यांनी सांगितले. शिष्टमंडळामध्ये महाराष्ट्र राज्य पदवीधर शिक्षक संघटनेचे सरचिटणीस मनोज मराठे, एकल शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष विकास खांडेकर, अलिबाग शिक्षक पतपेढीचे व्हॉईस चेअरमन नितीन पाटील, शिक्षक परिषद अलिबाग तालुका अध्यक्ष संजय पोईलकर, शिक्षक परिषदेचे अलिबाग तालुक्याचे कार्याध्यक्ष जयवंत पाटील आदी उपस्थित होते.

# विंडीजची सुपर-८मध्ये धडक

## वर्ल्डकपमध्ये नेपाळचे आव्हान संपुष्टात

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर रविवारी क्रिकेट चाहत्यांना कॅरेबियन पॉवरचा जबरदस्त तडाखा पहायला मिळाला. आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या थरारात वेस्ट इंडिजने आपला विजयी वारू उधळत नेपाळचा नऊ गडी राखून धुव्वा उडवला. या विजयासह सलग तीन सामने जिंकून विंडिजने सुपर-८ फेरीसाठी पात्र ठरणारा स्पर्धेतील पहिली संघ होण्याचा मान पटकावला आहे.



टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा कर्णधार शाई होपचा निर्णय विंडीजच्या गोलंदाजांनी सार्थ ठरवला. मॅथ्यू फोर्डने सुरुवातीलाच नेपाळच्या फलंदाजांना जखडून ठेवले. त्याने चार षटकांत अवघ्या १० धावा देत नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलचा महत्त्वाचा बळी टिपला. अनुभवी जेसन होल्डरने आपल्या अनुभवाचा पुरेपूर वापर करत २७ धावांत चार गडी बाद करून नेपाळचे कंबरडे मोडले. नेपाळची अवस्था एकवेळ ५ बाद ४६ अशी दयनीय होती, मात्र दीपेंद्र सिंह ऐरी (५८ धावा) आणि सोमपाल कामी (२६*) यांच्या झुंजार खेळीमुळे नेपाळला २० षटकांत ८ बाद १३३ धावांपर्यंत मजल मारता आली.

१३४ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी वानखेडेवर चौकार-षटकारांची आतषबाजी केली. सलामीवीर बाद झाल्यानंतर कर्णधार शाई होप आणि शिमरोन हेटमायर यांनी नेपाळच्या गोलंदाजीची पिसे काढली. होपने ४४ चेंडूंत पाच चौकार आणि तीन षटकारांसह नाबाद ६१ धावांची कर्णधारी खेळी केली. त्याला हेटमायरने ३२ चेंडूंत ४६ धावांची नाबाद साथ दिली. या जोडीने अवघ्या १५.२ षटकांत ९१ धावांची अभेद्य भागीदारी करत लक्ष्य आरामात गाठले.

या पराभवामुळे नेपाळचे या विश्वचषकातील आव्हान अधिकृतपणे संपुष्टात आले आहे. दुसरीकडे वेस्ट इंडिजचा संघ सुपर-८ फेरीत पोहचला आहे. विंडीज आता १९ फेब्रुवारीला इटलीविरुद्ध आपला अखेरचा साखळी सामना खेळणार आहे.

# हा विजय समस्त भारतीयांचा -सूर्यकुमार यादव

**मुंबई : प्रतिनिधी**



पाकिस्तानविरुद्धच्या विजयानंतर भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव चांगलाच खूष दिसला. भारताच्या विजयानंतर बोलताना सूर्यकुमारने हा विजय सर्व देशवासीयांचा असल्याचे म्हटले. याचबरोबर त्याने ७७ धावा ठोकणाऱ्या इशान किशनचेदेखील तोंडभरून कौतुक केले.

सूर्यकुमार यादव म्हणाला, आम्ही ज्या प्रकारचे क्रिकेट खेळत आलो आहोत त्याच प्रकारचे आम्ही आजच्या सामन्यातदेखील खेळलो. मी नाणेफेकीवेळीच सांगितले होते की इथे प्रथम फलंदाजी करणे हा चांगला निर्णय आहे. गेल्या काही सामन्यांपासून इशान किशन जशी फलंदाजी करतोय तशीच त्याने आजच्या सामन्यात फलंदाजी केली. त्यामुळे संघाला आघाडी मिळाली.

सूर्या पुढे म्हणाला, पॉवर प्लेमध्ये कोणाला तरी जबाबदारी घ्यायला हवी होती. इशानने ती घेतली. पॉवर प्लेमध्ये आम्ही खूप पुढे होतो. त्यानंतर ७ ते १५ या षटकांमध्ये थोडे रेंगाळलो, मात्र हीच तर टी २० क्रिकेटची सुंदरता आहे. तिलक, शिवम आणि रिंकूने ज्या प्रकारे फलंदाजी केली मला वाटते ते खूप कौतुकास्पद आहे.

सामन्यानंतर सूर्या म्हणाला, ज्यावेळी आम्ही १७५ धावांचा आकडा गाठला त्यावेळी आम्हाला वाटले की आम्ही १५ ते २० धावा जास्त केल्या आहेत. जर आम्ही १५५ धावा केल्या असत्या सामना टाईट झाला असता, मात्र १७५ हा चांगला स्कोअर होता. हार्दिक पांड्याने नवीन चेंडूवर गोलंदाजी करत चांगली ग्रीप निर्माण केली. बुमराहने जे तो करतो ते या सामन्यातदेखील उत्तम प्रकारे केले. त्याने त्याला जगातील सर्वोत्तम गोलंदाज का म्हणतात हे दाखवून दिले.

सूर्याने, वरूण, कुलदीप आणि अक्षरचीही स्तुती केली. तो म्हणाला, वरूण, कुलदीप, अक्षर आणि तिलक यांनीदेखील टिच्चून मारा केला. मला वाटते की, सर्वांना सामूहिक कामगिरी केली.



# यूएसडब्ल्यूपीएलमध्ये उलवे ग्लॅडिएटर्स संघ विजेता

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

उलवे सेना वूमन्स प्रीमियर लीग सीझन ३ महिला क्रिकेट स्पर्धा उलवे सेक्टर ५ येथील सीपी गोएंका स्कूलच्या टर्फवर मोठ्या उत्साहात पार पडली. यामध्ये स्थानिक महिला खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

अंतिम सामन्यात चुरशीची लढत पहायला मिळाली. दमदार कामगिरीच्या जोरावर उलवे ग्लॅडिएटर्स संघाने विजेतेपद पटकावले, तर उलवे टायटन्स संघ उपविजेता ठरला. दोन्ही संघांनी शेवटपर्यंत झुंज देत उत्कृष्ट खेळ सादर केला. या स्पर्धेतील शर्वरी डोखरे हिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धेस प्रमुख पाहुण्या म्हणून भाजप महिला मोर्चाच्या उलवे नोड अध्यक्ष ॲड. योगिता भगत, डॉ. दीपाली गोडघाटे आणि रोशनी डिमेलो उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघाला चषक आणि पारितोषिक प्रदान करण्यात आली. त्यांनी आपल्या भाषणात महिला सक्षमीकरणासाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे नमूद केले.

या स्पर्धेसाठी उपस्थित टीम ओनर्समध्ये रविशेठ पाटील (अध्यक्ष साई संस्थान वहाळ), ॲड. योगिता भगत, डॉ. दिपाली गोडघाटे, रोशनी डीमेलो, रेचेल डीमेलो यांचा विशेष सहभाग होता.

स्पर्धेचे आयोजन उलवे सेना सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आले होते. आयोजन समितीमध्ये शेखर काशीद, सागर भगत, सोपान सूर्यवंशी, विनय जोबनपुत्रा, अमित झा, नित्यानंद पांडेय, सरोज माणवटकर, कंचन शेठ, वर्षा नलावडे, गणेश काशीद, सौरभ काशीद, सिद्धू खरे, संतोष लोखंडे, वांची सोमस्कंदन, मनोज सिंह, गुड्डू कनोजिया, किरण लोहकरे, बिरुदेव गडदे, सतीश पाल, उमेश कनोजिया, गणेश डाकवे, खुशी कनोजिया, रक्षा तायडे यांनी परिश्रमपूर्वक जबाबदाऱ्या पार पाडल्या.

# वेस्टर्न महाराष्ट्र व कोकण रिजनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेने नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ आणि टेबल टेनिसपटू मार्कंडेय उपाध्याय यांच्या सौजन्याने व पिरॅमल फायनान्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने वेस्टर्न महाराष्ट्र व कोकण रिजनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धा नुकतीच नवीन पनवेल येथे झाली.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील टेबल टेनिस खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन पिरॅमल फायनान्स लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर मार्कंडेय उपाध्याय व अतुल देशमुख यांच्या हस्ते झाले.

बक्षीस वितरण वेस्टर्न महाराष्ट्र व कोकण रिजनल टेबल टेनिसचे चेअरमन संजय कडू यांच्या हस्ते झाले. स्पर्धेसाठी चिफ रेफरी म्हणून डी. आर.साळसकर व शामल डेब्बार्मा यांनी काम पाहिले, तर निकलस दास, विजय ठिक, डॉ.विलास धांडे, महेद्र कास्टे, निखली आढे, सौरव यादव, मैत्रेय नाईक व सचिन नाईक यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धेवेळी सातारा जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे सेक्रेटरी ललीत सातगरे व सुदीप भस्मे, सोलापूर जिल्हा प्रशिक्षक गणेश स्वामी, संग्राम राजशिर्के, कोल्हापूरचे ओमकार गुरव व बांधीवडेकर, सिंधुदुर्ग जिल्हा असोसिएशनचे सेक्रेटरी हेमंत वालकर आदी उपस्थित होते. विजेत्यांना महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनच्या नियमानुसार एकूण ५० हजार रुपये, आकर्षक चषक, पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**गटनिहाय विजेते व उपविजेते**

११ वर्षाखालील : मुली-समृद्धी मानवेकर कोल्हापूर, श्रेया मेन सातारा, मुले-राजवर्धन तिवारी सोलापूर, आक्षित ऐनापुरे सातारा; १३ वर्षाखालील : मुली-गीत जगताप कोल्हापूर, श्रावणी मेन सातारा, मुले-राजवर्धन तिवारी, आक्षित ऐनापुरे; १५ वर्षाखालील : मुली-गीत जगताप कोल्हापूर, निहारीका कुलकर्णी कोल्हापूर, मुले-संकल्प बांधीवडेकर कोल्हापूर, वेदांत खळादे सोलापूर; १७ वर्षाखालील : मुली-वेदांकिता पाटील सोलापूर, जान्हवी भोसले कोल्हापूर, मुले-संकल्प बांधीवडेकर, वेदांत खळादे; १९ वर्षाखालील : मुली-निहाली पाटील कोल्हापूर, शिवाली सानप सोलापूर, मुले-संकल्प बांधीवडेकर, वेदांत खळादे; महिला-अनिशा पात्रा रायगड, निहाली पाटील; पुरुष संकल्प बांधीवडेकर, वेदांत खळादे.

Rayat Shikshan Sanstha's

**Sau. Shakuntala Ramsheth Thakur School, Ulwe**

Sector-24, Plot No. 240, 241 Pushpaknode, Ulwe,
Tal- Panvel. Pin No. 410 206 Ph. No. 022-27212031
Email Id:- sau.srtcbseulwa@gmail.com
CBSE Affiliation No.:1131477 . School Code :31466 . U-Dise N. :27240809410

**Walk In Interview 2026-2027**

Walk In Interview: Date - 7th March 2026
Time - 8:30 am to 4:00 pm,
Venue :- Sau. Shakuntala Ramsheth Thakur School, Ulwe

| Sr. No. | Name of the Post | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1) | Principal | Post Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. 10 to 15 years of teaching experience and 5 years administrative experience in CBSE Affilated School | 1 |
| 2) | Secondary Co-Ordinator | Graduate / Post Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. 5 years experience in CBSE School of which 2 years in Co-ordinator position | 1 |
| | Primary Co-Ordinator | Graduate / Post Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. 5 years experience in CBSE School of which 2 years in Co-ordinator position | 1 |
| 3) | Pre-Primary (Nursery to Sr.KG) | H.S.C/Graduate / Post Graduate with Montessori/E.C.C.Ed./ P.T.C.(From a recognised Institute) | 6 |
| 4) | PRT Teachers (STD- 1st to 5th) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST,P.E., Art, Music, Computer, Special Educator | Graduate /Post Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University.(Prefered CTET /TET qualified teachers) B.A.,/B.Sc.,/ B.Com. ,B.P.Ed. ATD / G.D. Art/BFA/ AM B.A. / M.A., Sangeet Visharad B.Sc. (IT/CS)/ M.Sc. (IT/CS)/ BCA/ MCA/ BE (with B.Ed. Preferred) From a recognised University. Graduate with Diploma/ Degree in Special Educator (DSE), RCI Certified From a recognised University. (CBSE Exprienced teachers preferred) | 15 |
| 5) | TGT Teacher (STD- 6th to 10th) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST,P.E., Computer , Art, Dance ,Counsellor | Graduate/ Post Graduate in the concerned subject with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. (Preferred CTET/ TET qualified teachers) B.Sc. (IT/CS)/ M.Sc. (IT/CS)/ BCA/ MCA / BE & B.Ed. B.A. B.P.Ed./B.Sc. B.P.Ed./ B.Com. B.P.Ed. Graduate/ Post Graduate in Psychology with Certificate of Diploma in Guidance & Counselling, Clinical Psychologist, RCI Certified (Registered) (CBSE Exprienced teachers prefered) | 12 |
| 6) | Librarian | B.Lib. / M.Lib. 2 years of experience in CBSE School | 1 |
| 7) | Lab Assistant | B.Sc. In Science with Experience in CBSE School | 1 |
| 8) | H. Clerk & Clerk | B.Com./ M.Com 2 years of experience in CBSE School A/C using tally. | 2 |
| 9) | Peon | H.S.C, 2 years' experience of working in a CBSE school preferred | 2 |

Roster will be applicable for Primary, Upper Primary & Secondary Teacher

| Category | SC | ST | VJ-A | NT-B | NT-C |
|---|---|---|---|---|---|
| | 13.0% | 7.0% | 3.0% | 2.5% | 3.5% |
| No.of Post | 5 | 2 | 2 | 0 | 2 |

| NT-D | SBC | OBC | EWS | SEBC | Open | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 2.0% | 2.0% | 19.0% | 10.0% | 10.0% | 28.0% | |
| 0 | 0 | 10 | 3 | 3 | 15 | 42 |

Instructions :
1) Only candidates with excellent subject knowledge and a professional degree are required to appear for the interview.
2) The Application form are available in the school office from date of advertisement time 10:00 am to 5:00 pm. Applications form fee is Rs- 100/-
3) Bring your original documents for verification at the time of interview.
4) Candidates can Submit their CV to **sau.srtcbseulwa@gmail.com** from date of advertisement until 03/03/2026.
5) Last day to submit your CV, duly filled applications from along with attested copy of your document & cover letter in the office is 03/03/2026 up to 5:00 pm, excluding holidays. Originals will be verified at the time of interview.
6) Candidates with prior work experience in a CBSE-affiliated school will be given preference.
7) The decision of the selection committee will be final.
8) Please ensure and follow all instructions carefully.

Secretary
Rayat Shikshan Sanstha, Satara

# पाकिस्तानविरुद्ध इशान किशनचे अर्धशतक ठरले खास

**कोलंबो : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० विश्वचषकात रविवारी भारताने कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला नमवले. कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारतीय सलामीवीर इशान किशनने आपल्या बॅटने पाकिस्तानी गोलंदाजांची अक्षरशः पिसे काढली. इशानने अवघ्या ४० चेंडूंत ७७ धावांची स्फोटक खेळी साकारली, ज्यात १० चौकार आणि तीन उत्तुंग षटकारांचा समावेश होता. इशानने या खेळीत अनेकांना मागे टाकले.

इशानच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे नववे अर्धशतक ठरले. त्याने अवघ्या २७ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. यासह भारत-पाकिस्तानदरम्यानच्या टी-२० विश्वचषक इतिहासातील तो सर्वात वेगवान अर्धशतक झळकावणारा फलंदाज ठरला आहे तसेच दोन्ही देशांमधील टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा विचार करता हे तिसरे सर्वात वेगवान अर्धशतक आहे. ७७ धावांच्या या खेळीसह इशानने दोन्ही देशांमधील टी-२० सामन्यातील चौथ्या सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येची नोंद केली. या बाबतीत त्याने गौतम गंभीरला मागे टाकले आहे.



सध्याच्या टी-२० विश्वचषकात इशान किशन जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. त्याने आतापर्यंत तीन डावांत ५२.६६च्या सरासरीने आणि १७९.५६च्या स्ट्राइक रेटने १५८ धावा कुटल्या आहेत. त्याने नामीबियाविरुद्ध ६१ धावांची वादळी खेळी केली होती, तर अमेरिकेविरुद्ध २० धावांचे योगदान दिले होते.

## कोलंबोत रूद्रावतार

भारतीय संघाची सुरुवात अतिशय खराब झाली होती. अवघ्या एका धावेवर अभिषेक शर्माच्या रूपाने भारताने पहिला बळी गमावला, मात्र त्यानंतर इशान किशनने तिलक वर्मासोबत दुसऱ्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी रचली. विशेष म्हणजे, जेव्हा इशान बाद झाला तेव्हा भारताची एकूण धावसंख्या ८८ होती, ज्यातील तब्बल ७७ धावा एकट्या इशानच्या होत्या. इशानने पाकिस्तानी गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले.

# माणगावच्या खेळाडूंची राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत चमक



**माणगाव : प्रतिनिधी**

बारामती येथे झालेल्या खुल्या राष्ट्रीय तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या दोन शाळांतील विद्यार्थ्यांनी सुवर्ण आणि कांस्यपदकांची कमाई केली आहे.

गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मीडियम स्कूलचा इयत्ता नववीतील रूद्र दर्शना बेबिन नायर याने ज्युनियर ५० किलो वजन गटात अप्रतिम खेळ सादर करत सुवर्णपदक पटकावले. त्याचप्रमाणे मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई स्कूलचा इयत्ता सहावीतील आयान मोहम्मद अली लोखंडे याने सब-ज्युनियर ३० किलो वजन गटात कांस्यपदक मिळविले. या दोन्ही खेळाडूंना तायक्कांदो प्रशिक्षक प्रतिक गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, चेअरमन नरेंद्र गायकवाड, अरुण पवार, नितीन बामगुडे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, दोन्ही शाळांचे प्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# रशीद खानचा विश्वविक्रम

**मुंबई** : अफगाणिस्तानचा लेगस्पिनर रशीद खान हा टी-२० इतिहासात ७०० विकेट्स घेणारा जगातील पहिला गोलंदाज ठरला आहे. रशीद टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटशिवाय जगभरात विविध टी-२० लीग खेळतो. जिथे त्याने आपल्या फिरकीने मैदान गाजवले आहे आणि यासह त्याने ७०० विकेट्सचा टप्पा गाठला.

टी-२० विश्वचषकात सोमवारी पहिला सामना अफगाणिस्तान व युएई यांच्यात खेळवला गेला. या सामन्यात पहिल्या डावात खेळत असताना संघाचा कर्णधार रशीद खानने एक विकेट घेताच विश्वविक्रम आपल्या नावे केला.

# अभिषेक शर्माच्या नावे नकोशी कामगिरी

**कोलंबो : वृत्तसंस्था**

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघाचा युवा सलामीवीर अभिषेक शर्मा अपयशी ठरला. पोटातील संसर्गामुळे रुग्णालयात दाखल व्हावे लागल्यानंतर पुनरागमन करणाऱ्या अभिषेकला मैदानात मात्र नशिबाची साथ लाभलेली नाही. पाकिस्तानविरुद्धच्या हाय-व्होल्टेज सामन्यात चार चेंडूंचा सामना करूनही त्याला खाते उघडता आले नाही.



आपल्या पहिल्यावहिल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुरुवातीच्या दोन सामन्यांत शून्यावर बाद होणारा अभिषेक शर्मा जगातील केवळ तिसरा खेळाडू ठरला आहे. पाकिस्तानविरुद्ध शून्यावर बाद होताच अभिषेकने भारतीय क्रिकेटमधील अनेक दिग्गजांना मागे टाकत काही नकारात्मक विक्रम नावावर केले आहेत. एकाच वर्षात सर्वाधिक वेळा शून्यावर बाद होणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत अभिषेक आता दुसऱ्या स्थानी पोहचला आहे. त्याने युसूफ पठाण, रोहित शर्मा, विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव यांना मागे टाकले आहे, जे एका वर्षात प्रत्येकी तीन वेळा शून्यावर बाद झाले होते.

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक वेळा शून्यावर बाद होणाऱ्या भारतीयांच्या यादीत अभिषेक आता शिवम दुबे, रवींद्र जडेजा, गौतम गंभीर आणि विराट कोहली यांच्यासह संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर आला आहे.

टी-२० विश्वचषकात सलामीवीर म्हणून सर्वाधिक वेळा शून्यावर बाद होणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत अभिषेकने आता गौतम गंभीर आणि विराट कोहली यांची बरोबरी केली आहे. गंभीर आणि कोहलीही प्रत्येकी दोन वेळा सलामीवीर म्हणून शून्यावर बाद झाले होते.

## सहापैकी चार डावात शून्यावर बाद

अभिषेकची मागील काही सामन्यांतील आकडेवारी त्याच्या प्रतिभेला साजेशी राहिलेली नाही. त्याने मागील सहा डावांत केवळ ९८ धावा केल्या, ज्यात एका अर्धशतकाचा समावेश आहे, मात्र या सहापैकी चार डावांत तो शून्यावर बाद झाला असून त्यातील तीन वेळा तो पहिल्याच चेंडूवर माघारी परतला आहे. त्याची मागील सहा डावांतील धावसंख्या ०, ०, ३०, ०, ६८*, ० अशी राहिली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com